सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ०७ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १९५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महिला सशक्तीकरण अभियान; मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान व राज्यस्तरीय योजनांचे लोकार्पण

# लाडकी बहीण योजनेच्या लाभाची रक्कम टप्प्या-टप्प्याने वाढविणार : मुख्यमंत्री

छत्रपती संभाजीनगर, दि.६, (विमाका) :- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही नेहमी सुरु रहावी यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्यात आली असून ही योजना बंद तर पडणार नाहीच उलट लाभाची रक्कम ही टप्प्या टप्प्याने वाढविण्यात येईल,असा शब्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे आपल्या लाडक्या बहिणींना दिला.





छत्रपती संभाजीनगर येथे खडकेश्वर परिसरात मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदान येथे 'मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान' अंतर्गत 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लाभार्थी सन्मान' आणि 'राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा' मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडला.

पालकमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, खा. डॉ. भागवत कराड, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. प्रदीप जयस्वाल, आ. रमेश बोरनारे, उर्जा विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे, जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड उपस्थित होते.

लाडकी बहिण योजनेचे पंतप्रधानांकडून कौतुक

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरु केली आहे. या योजनेतून महिलांना दरमहा दीड हजार रुपयांचा लाभ दिला जात आहे. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्याचे एकत्रित तीन हजार रुपये महिलांच्या खात्यात सुरु करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यापूर्वी तीन महिन्यांचे साडेचार हजार रुपये महिलांच्या खात्यात जमा केले आहेत. गरिबीची जाणीव असल्याने या सरकारने गोरगरीब महिलांच्या संसाराला मदत करण्यासाठी ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. सुमारे अडीच कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. या योजनेतून मिळणाऱ्या रक्कमेतून काही महिलांनी छोटे-छोटे व्यवसाय सुरु केले असून त्यामधून रोजगार आणि आर्थिक उत्पन्नाचे साधन निर्माण झाले आहे. या महिला स्वतःच्या पायावर उभा राहिल्या आहेत, असेही ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे कौतुक केले आहे. महिला सक्षमीकरणाच्या बाबतीत महाराष्ट्राचे कार्य हे देशासाठी दिशादर्शक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबद्दल राज्य शासनाचे कौतुक केले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी पुरेशी तरतूद केली असून ही योजना बंद होणार नाही, उलट भविष्यात लाभाची रक्कम टप्प्या-टप्प्याने वाढविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कृषीपंपांसाठी शून्य वीज बिलामुळे शेतकऱ्यांना लाभ

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शेतीसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. जवळपास ४५ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ झाला असून त्यांचे वीज बिल शून्य झाले आहे. युवकांना रोजगाराचे प्रशिक्षण देण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली. यामधून प्रशिक्षण काळात त्यांना सहा हजार ते दहा हजार रुपये विद्यावेतन दिले जात आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून यामधून उभा राहणाऱ्या उद्योगांमुळे राज्याच्या विकासाला गती मिळेल. रोजगार निर्मिती होईल. मुख्यमंत्री वयोश्री योजनेतून वयोवृद्ध नागरिकांना विविध उपकरणे खरेदीसाठी तीन हजार रुपयेपर्यंत सहाय्य करण्यात येणार आहे.

शासनाच्या योजनांमुळे सर्वसामान्यांना आधार

प्रधानमंत्री मोदीजींनी ठाणे आणि मुंबईतल्या ३३ हजार कोटींपेक्षा जास्तीच्या प्रकल्पांची पायाभरणी केली आहे. शेंद्राच्या ऑरिक सिटीचं नाव तर जगभर गाजायला सुरुवात झाली आहे. टोयाटो किर्लोस्करचा २० हजार कोटींचा प्रकल्प तिथे होत आहे. लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुलीसाठी मोफत उच्च शिक्षण योजना, शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना अशा अनेक योजना सर्वसामान्यांना आधार देणाऱ्या ठरल्या असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

## चिमुरडीवर अत्याचार प्रकरणी नराधम शिक्षकास अटक

माजलगाव दि.४-दोन दिवसापूर्वी येथील एका शाळेत अल्पवयीन साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी त्याच शाळेतील नराधम शिक्षकास पोलिसांनी अटक केली आहे.राहुल अंबादास वायखिंडे मूळ रा. ब्रह्मगाव ता.कोपरगाव जि.अहील्यानगर असे आरोपीचे नाव आहे - राज्यात शाळेत शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींवर अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरूच असून बीड जिल्ह्यातील माजलगाव येथील एका शाळेतील बालवाडीत साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना २५ ते २८ सप्टेंबर दरम्यान घडली.या घटनेप्रकरणी मुलीच्या पालकांच्या तक्रारीवरून गुरूवारी अज्ञात व्यक्ती विरोधात लैंगिक अत्याचार गुन्हा दाखल करण्यात आला.तर शहरात सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.



माजलगाव शहरात एका शाळेत बालवाडी आहे. त्यामध्ये परिसरातील लहान मुले मुली दररोज येतात या परिसरातीलच एक साडेपाच वर्षाची चिमुरडी नियमित शाळेत येते तिला शाळेतील एका अज्ञात इसमाने दि .२५ ते २८ सप्टेंबर रोजी डबा खाल्यानंतर अत्याचार केला. घटनेनंतर चिमुरडी ताप येऊन आजारी पडली त्यामुळे तिला दवाखान्यात उपचार करण्यात आले.

घरी आल्यावर तिने शाळेत झालेली ही गोष्ट आपल्या पालकांना सांगितली.पांढरे कपडे घातलेला माणसाला मी ओळखते असेही सांगितले. या घटनेनंतर चिमूरडीच्या पालकांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरूवारी तक्रार दिली त्यानुसार अज्ञात व्यक्ती विरुद्ध लैंगिक अत्याचार पोस्को गून्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनंतर पोलिसांनी सदरील अल्पवयीन मुलीची अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली तर या घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय अधिकारी धीरजकुमार बच्चू व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांचे सह पोलीस उपनिरीक्षक सुनील दिंडे यांनी सदरील शाळेची चौकशी करून तेथील सीसीटीव्ही ची तपासणी केली तसेच या शाळेतील सर्व शिक्षकांची ओळख परेड घेतली तसेच शिक्षकांच्या फोटो मधून सदरील चिमुरडीने आरोपी शिक्षकाचा फोटो पाहून त्याची ओळख पटवली त्यानंतर पोलिसांनी संबंधित शिक्षक

राहुल अंबादास वायखिंडे सध्या रा.माजलगाव मूळ रा. ब्रह्मगाव ता.कोपरगाव जि.अहील्यानगर यास अटक केली आहे. सदरील शिक्षकास न्यायालय समोर हजर केले असता. न्यायदंडाधिकारी धर्माधिकारी यांनी ४ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## आगामी काळात शिक्षण, शेती, पाणी, उद्योग व्यवसाय, रोजगार यावरती काम करणार : आ. बंब

तभा वृत्तसेवा दि ६

खुलताबाद प्रतिनिधी - तालुक्यातील बोडखा येथे चार हजार पाचशे कामगार कल्याण लाभार्थ्यांना संसार भांडी वाटप व विधानसभा प्रचाराचा शुभारंभ या कार्यक्रमाप्रसंगी आमदार प्रशांत बंब त्यावेळी बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर आ प्रशांत बंब, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, , तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे,, गणेश अधाने , दिनेश अंभोरे, सतिश खंडागळे, प्रकाश चव्हाण, तसेच तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान तालुक्यातील किनगाव फाटा ते चिकलठाण रस्ता ९५ कोटी रु. उद्घाटन सोहळा,सहा पुलांच्या पाच कोटी ५० लक्ष रुपयांच्या कामाचा लोकार्पण सोहळा, धामणगाव येथे मुख्य रस्त्याच्या एक कोटी रुपये कामाचा उद्घाटन सोहळा, धामणगाव ते रेल सावंगी रस्त्याचा तीन कोटी ५० लक्ष रु. उद्घाटन सोहळा त्याच बरोबर परिसरातील शेकडो युवकांचा भाजपा मध्ये पक्ष प्रवेश सोहळा. रविवारी (दि.६) पार पडला.

पुढे बोलताना आमदार बंब म्हणाले की, आपल्या मतदारसंघात षडयंत्र सुरू झाले आहे. आपल्या पिढ्या बरबाद करणे आणि आपल्या मराठवाड्याला मागास करणे. कारण मी पाण्यावर भांडतो मी शिक्षकांच्या विरोधात भांडतो. त्यामुळे सर्व मिळून कट कारस्थान करत आहे. परंतु मी माझ्या मतदारसंघातून गोरगरीब जनतेवर अन्याय झालेला सहन करणार नाही. यांच्या विरोधात जोमाने काम करणार असून पुढील पंचवार्षिक . मध्यम आणि श्रीमंतांनी देखील जिल्हा परिषद शाळेत आपल्या मुलांना दाखल केले पाहिजे अशी शिक्षणव्यवस्था तयार करणार असल्याचे ते म्हणाले. मोठ्या संख्येने नागरिक महिला व भाजप कार्यकर्ते पदाधिकारी नवं युवक उपस्थित होते.

## पोलीस पाटलांच्या सर्व मागण्यांबाबत शासन सकारात्मक : एकनाथ शिंदे

छत्रपती संभाजीनगर, दि.६, : पोलीस पाटील हा गाव पातळीवरील प्रशासनाचा एक महत्त्वाचा घटक असून शासनाचे नाक, कान आणि डोळे आहेत. गावातील सर्व घटकांमध्ये समन्वय राखण्याचे काम पोलीस पाटील करीत असतात. त्यांच्या सर्व मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून संवेदनशिलतेने निर्णय घेऊ,असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पोलीस पाटील संघटनेच्या मेळाव्यात दिले.

महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशन संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय आभार मेळावा व सत्कार समारंभ समृद्धी लॉन्स, हर्सूल सावंगी रोड येथे आयोजित करण्यात आला होता. पोलीस पाटीलांचे मानधन शासनाने १५ हजार रुपये केले त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आभार पोलीस पाटील संघटनेने व्यक्त केले. या मेळाव्यास जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार,शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष संजय शिरसाट, आ. प्रदीप जयस्वाल, आ. रमेश बोरनारे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, तसेच पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष महादेव नागरगोजे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने मेळाव्यास सुरुवात झाली. प्रास्ताविक महादेव नागरगोजे यांनी केले. यावेळी मुख्यमंत्र्यांचा पोलीस पाटील यांनी सत्कार केला.

सत्काराला उत्तर देतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पोलीस पाटील हे प्रशासनाचे नाक कान आणि डोळे आहेत. आपल्याला २४ बाय ७ काम करावे लागते. सरकारही असेच २४ बाय ७ काम करणारे आहे. आपले हे प्रामाणिक काम असल्यानेच शासनाने आपले मानधन साडेसहा हजार रुपयांवरुन १५ हजार रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला. सढळ हस्ते न्याय दिला आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी तसेच समाजातील विविध घटकांसाठी शासनाने राबविलेल्या योजनांचा उल्लेख करुन मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, कुटुंबातील प्रत्येक घटकाला शासन लाभ देत आहे.

## विहितेची गळफास;-मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या पतीस अटक;वरठाण येथील घटना


सोयगाव;-पतीच्या सतत व वारंवार शारीरिक व मानसिक त्रास देऊन आर्थिक छलास कंटाळून सोयगाव तालुक्यातील वरठाण येथील विवाहितेचा गळफास घेऊन आत्महत्या प्रकरणी शुक्रवारी रात्री बारा वाजता पतीस अटक करून शनिवारी सोयगाव च्या न्यायालयाने त्यास हर्सूलला रवानगी केली आहे.या घटनेमुळे वरठाण परिसरात शोककळा व्यक्त करण्यात येत आहे. पूजा सोपान संसारे(वय.२७) असे गळफास घेवून मृत झालेल्या विवाहितेचा नाव आहे गुरुवारी रात्री विवाहितेने पतीने वेळोवेळी घरघुती कारणावरून शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व नानसिक छळ करुन त्यांचे छळास कंटाळून गुरुवारी रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास , वरठाण येथे राहते घरी लोखंडी फॅनला नायलॉनच्या दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली आहे.याप्रकरणी पति सोपान पितांबर संसारे व अन्य एक अशा दोघांनी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने पती सोपान संसारे(वय.३३) यास शुक्रवारी रात्री बारा वाजता अटक केली दरम्यान मृत पूजा वर शुक्रवारी दुपारी बनोटी येथील आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करून सायंकाळी सहा वाजता पोलीस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले होते.मृत पूजा च्या पश्चात पती,दोन मुली,दोन मुले असा परिवार आहे.याप्रकरणी सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रजाक शेख,संदीप सुसर,राजू बर्डे,सफौ. दिलीप पवार,गजानन दांडगे आदी तपास करत आहे .

## छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गवर हायवा च्या धडकेत तरुण गंभीर जखमी झाला असून उपचार दरम्यान मृत्यू झाला

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ६ छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर भरधाव वेगाने धावणाऱ्या हायवाने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने दुचाकीस्वार तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवार (दि.५) दुपारच्या सुमारास राजकुंवर महाविद्यालय परिसरात घडली होती.

यावियषी सविस्तर माहिती अशी की, आदित्य संजय डापके (वय.१९ रा.अन्वी ता.सिल्लोड) हा तरुण दुचाकीवरून (एम.एच.२० ई डब्ल्यू.६७४५) ने छत्रपती संभाजीनगर कडून जळगावच्या दिशेने जात असतांना भरधाव वेगाने येणाऱ्या हायवा (एम.एच १२ एस.एक्स ३७२६) ने दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिल्याने दुचाकीस्वार तरुण आदित्य डापके च्या डोक्याला गंभीर स्वरूपाची इजा होऊन तो या अपघातात जखमी झाला.



घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन अपघातात जखमी तरुणाला उपचारासाठी सिल्लोड येथे रुग्णालयात दाखल केले.मात्र डोक्याला गंभीर स्वरूपाची इजा झाल्याने त्याला पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र रविवारी सकाळी उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला असल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले.यादरम्यान, घटनेतील हायवाचालक फरार झाला असून हायवा पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

सदरील घटनेचा तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि सुग्रीव चाटे करीत आहे.

## सरकारी रस्ता करून दिला रजिष्ट्री; बिडकीन येथे बोगस प्लॉट विक्री केल्याने बिल्डर कैलास पवार वर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ६ ऑक्टोबर - पैठण रोडवरील बिडकीन ग्रामपंचायत हद्दीमधे २०१२ साली श्रद्धा नगर नावाने प्लॉटिंग करून फसवणुक झाल्याने बिल्डरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ओमप्रकाश नथुप्रसाद जैस्वाल वय - ५६ रा बिडकीन ता. पैठण यांनी सन २०१२ साली कैलास नानासाहेब पवार रा. एन-५ सत्यमनगर सिडको छत्रपती संभाजीनगर बिडकीन येथील गट नं-८२३ श्रदधानगर मध्ये एन ए ४४ प्लाटींग पाडलेले असुन धंद्यासाठी पैठण रोडलगत चार पाच प्लॉट घेवुन टाका असे सांगीतले वरुन कैलास पवार याने जैस्वाल यांना गट नं-८२३ चा जिल्हाधिकारी कार्यालय यांनी केलेला एन ए ले आऊट दाखवला तसेच ग्रामपंचायत बिडकीन यांचा ८अ चा उतारा, प्लाटींगचा नकाशा व आदीत्य बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे कैलास नानासाहेब पवार या नावाचा सात बारा दाखवला. त्यामुळे जैस्वाल यांनी दि-०६/०१/२०१२ रोजी आदीत्य बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे कैलास नानासाहेब पवार रा. एन-५ सत्यमनगर सिडको याचे कडुन.बिडकीन गट नं- ८२३ मध्ये पैठण रोड लगत प्लॉट क्रमांक- २९ ची पैठण येथे दुय्यम निबंधक कार्यालयात जावुन रजिष्ट्री करुन घेतली. त्यानंतर पुन्हा प्लॉट नं- २७ ची दि १२/१२/२०१२ ला व, प्लॉट क्रमांक-२८ ची, दि-१८/१२/२०१२ ला दुय्यम निबंधक कार्यालय पैठण येथे रजिष्ट्री करून घेतली. त्यानंतर दि -०७/१२/२०२३ ला तहसिलदार पैठण यांची नोटीस आली व त्यांनी नोटीसव्दारे कळविले की, तुमचे प्लॉट क्रमांक-२५,२७,२८,२९ हया प्लॉटची जागा ही बिडकीन शेत गट नं- ८२२,८२३,८२४ मध्ये जाण्यासाठी भुमी अभिलेख प्रमाणे सरकारी गाडी यही वाटेचा रस्त्यावर असून रस्ता मोकळा करणे आहे असे कळविले. त्यावेळी समजले की, आदीत्य बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे कैलास नानासाहेब पवार यांनी बिडकीन गट नं-८२३ प्लॉट नं-२५,२७,२८,२९ मध्ये हे चार प्लॉट विक्री करून फसवणुक केली आहे. तहसिलदार पैठण व त्यांचे पथक हे रस्ता मोकळा करण्यासाठी आले त्यावेळी कैलास नानासाहेब पवार यास फोन लावुन सांगीतले की, तुम्ही माझ्या सदर प्लॉट मध्ये फसवणुक का केली आहे, त्यावेळी त्यांनी जैस्वाल यांना सांगीतले की, माझ्याकडे भरपुर प्लॉट आहे तुमची गेलेली जी जागा आहे. त्या बदल्यात मी तुम्हाला बिडकीन गट नं- ८२३ मध्ये दुसरीकडे जागा देतो असे सांगीतले. त्यानंतर मी कैलास नानासाहेब पवार याचे कडे दोन तीन वेळेस त्याचे राहते घरी ओमप्रकाश जैस्वाल गेले असता तुमची जागा माझ्याकडे शिल्लक नाही मी तुम्हाला जागा देणार नाही काय करायचे ते करुन घ्या तुम्ही माझ्याकडे पुन्हा आले तर बघा असे म्हणुन मला जिवे मारण्याची धमकी दिली आहे. तरी बिडकीन येथील गट नं-८२३ मधील प्लॉट नं- २५,२७,२८,२९ हया प्लॉट मधील एकुण ४००० स्केअर फुट जागा ही सरकारी रस्त्यामध्ये गेलेली आहे.

मी आदीत्य बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे कैलास नानासाहेब पवार याने विकलेली जागा हि सरकारी आहे हे त्यास माहीत असताना देखील सरकारी क्षेत्र वाढवुन रजिष्ट्री करुन दिली फसवणुक केली असल्याने बिडकीन पोलीस ठाण्यात फिर्यादी ओमप्रकाश नथूप्रसाद जैस्वाल यांच्या तक्रारीवरून पवार वर गुन्हा दाखल करण्यात आला असून, कैलास पवार यांना अजून अटक केले नसल्याचे समजते, पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील करीत आहे. बिडकीन येथे गट नं ८२३ मधील अजून काही प्लॉट धारक बिल्डर पवार विरोधात तक्रार देणार असल्याचे समजते

### तू मला प्लॉट मागितला तर मी तुला जिवे मारुन टाकीन

**आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर ओमप्रकाश जैस्वाल यांनी पवार यांच्याशी संपर्क साधला असता त्याने त्या प्लॉटच्या बादल्यात इतर ठिकाणी तुम्हाला प्लॉट देतो असे म्हणून वेळ मारुन नेली, त्या नंतर अनेकवेळा भेट घेऊनही पवार हा जैस्वाल यांना प्लॉट देण्यात टाळाटाळ करत होता यातून दोघांत चांगला वाद झाला,आता यापुढे तू मला प्लॉट मागितला तर मी तुला जिवे मारुन टाकीन,अशी धमकीही पवार याने जैस्वाल यांना दिली असल्याचे पोलीसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे.**

**-ओमप्रकाश जैस्वाल बिडकीन प्लॉट धारक**



## तुम्हाला माहिती आहे का?

- आंबट चवीच्या फळांमध्ये सायट्रिक ॲसिड असतं.
- सम्राट अशोक राजा बिंदुसाराचा उत्तराधिकारी होता.
- रॉलेट ॲक्ट वर्ष १९१९ मध्ये लागू करण्यात आला.
- महाराणा प्रताप त्यांच्या घोड्याला बुलबुल म्हणत असत.
- बॉक्सर द रियल डिलचे नाव इवांडर होलिफील्ड आहे.

## अशी पाखरे येती...

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

# खादाड खाटीक



उंदीर-सरड्यासारखे छोटे प्राणी किंवा पक्षी आणि त्यांची पिल्लं हेच प्रमुख भक्ष्य असलेला खाटीक नावाचा पक्षी खादाड म्हणून ओळखला जातो. तो यासाठी की, सदैव निश्चल बसून भक्ष्याची टेहळणी करण्यात व्यस्त राहतो अन् सावज दिसताच क्षणी त्यावर झडप मारतो. काटेरी झाडावर झरझर नेऊन फस्त करतो. जेवढी भूक तेवढं खातो अन् शिल्लक भक्ष्य झाडावरील एखाद्या मोठ्या काट्याला टोचून ठेवतो. नंतर, केव्हातरी खाण्यासाठी! संपूर्ण मांसाहारी असणारा खाटीक एवढ्यावरच शांत बसेल तो खाटीक कसला? तो पुन्हा तयारीला लागतो पुढच्या शिकारीसाठी!

कर्कश्श आवाजाचा खाटीक पक्षी इतर पक्ष्यांच्या किंवा प्राण्यांच्या आवाजाची नक्कलही करण्यात माहिर आहे खाटीक! कर्कश्श असला तरी कधी मधुर आवाजही काढतो अन् दिसायलाही सुंदर असा हा पक्षी आहे. भारतात याच्या सुमारे दहा जाती आढळतात. मात्र, 'तांबूस पाठीचा खाटीक' भारतात मोकळ्या सपाट प्रदेशात आणि शेतीच्या आसपास सर्वत्र दिसून येतो. आकार आणि रंगांवरून या पक्ष्याच्या तीन उपजाती असून माळरानांवर, गवताळ प्रदेशात झाडांवर किंवा लटकणा?ऱ्या विविध तारांवर हमखास दिसून येतो. नर आणि मादी सारखेच दिसत असून काळ्या रंगाचे कपाळ, चोचीच्या बुडापासून डोळ्यांमधून मागे गेलेला एक काळा पट्टा, खांद्यापासून मागे शेपटीपर्यंतचा पाठीचा भाग तांबूस, लांब शेपटी अन् पंख काळे असणारा खाटीक बहुतांश वेळा एकटेच विहार करताना दिसून येतात. काटेरी झाडांवर तो आपले घरटे गवत आणि कापसाच्या सहाय्याने अन् सावजही तिथेच काटेरी झाडाला टांगून ठेवतो. सुमारे २५ सेंमी आकाराच्या खाटकाचे पोट पांढरे तर शेपटी काळी असते. उत्तम शिकारी पक्षी अशी याची ओळख आहे. याला ओळखायची सर्वात महत्त्वाची खूण म्हणजे डोक्यावरील काळी पट्टी! याचमुळे त्याचा डौलदारपणा लक्षात येतो. धारदार चोच, बळकट पाय अन् नख्या यामुळे मुळातच तो चपळ, शिकारी पक्षी म्हणून ओळखू येतो. चोच छोटी असली तरी एकदम वळलेली अन् बाकदार असल्यामुळे भक्ष्य त्याच्या तावडीतून सुटू शकत नाही. मादी खाटकाच्या विणीचा काळ हा मार्च महिन्यापासून तीन महिन्याचा असतो. मादी एका वेळी ४ ते ६ फिकट हिरव्या रंगाची, त्यावर तपकिरी ठिपके असलेली अंडी देते. खाटीक हा स्थानिक स्थलांतर असल्याने आपल्याकडे वर्षातील काही काळच ते नजरेत पडतात.




## मूठ



पाच बोटे एकत्र येऊन, त्यांची होते मूठ
मुठीच्या पायात असतो, निर्धाराचा बूट
मूठ जाते चाड्यावर, धन धान्य पेरायला
तेच पुढं कामी येतं, आपलं पोट भरायला
मूठ जाते माथ्यावर, राहते उभी जात्यावर
पिठाची नोंद होते, आजीबाईच्या खात्यावर
मूठ एक झाकलेली, फक्त सव्वा लाखाची
पत घेते सांभाळून, आम्हा बालक लोकाची
मूठ वळते आदेश येता, एकसाथ सावधान
ताला सुरात ऐकू येते, भारतभूचे राष्ट्रगान
मूठ आवळून तोंडावाटे दिले जातात नारे
जय हिंद, वंदे मातरम...विरश्रींचे वारे
मुठीमध्ये वज्रनिर्धार, खरेच असतो पक्का
अभ्यास केला नाही तर, पाठीत घालते बुक्का

- भानुदास धोत्रे
७९७२६२५०८६

## वंडर गर्ल
## अवनी फुलाडी



संजय पेंडसे/९४२२४४३२९५

**बाल मित्रांनो,** मला कल्पना आहे की, तुमच्यापैकी अनेकांना क्रिकेटची प्रचंड आवड आहे, मग तो मुलगा असो किंवा मुलगी! तुम्हाला कदाचित माहिती असेल पण, आता अंध म्हणजे नेत्रहीन लोकांची देखील क्रिकेटची टीम तयार झाली आहे. नुकतीच ती टीम जमशेदपूरला क्रिकेट खेळायला गेली. केवळ आवाजामुळे येणाऱ्या चेंडूचा भेद घेऊन क्रिकेट खेळणं हे काही सोपं नाही. असा हा तुमच्या सगळ्यांच्या आवडीचा खेळ क्रिकेटचं महत्त्व आता मुलींना देखील आहे. भारतातील महिलांची क्रिकेट टीम तर सध्या अग्रेसर आहे, आपली आजची वंडर गर्ल अवनी हिला पाचव्या वर्षी प्लास्टिकची बॅट हाती लागली आणि मग काय तिला बॅटिंगचा सूर गवसला. त्याचं वेडच लागलं म्हणा ना! क्रिकेट आणि मग शाळेत गेल्यावर व्हॉलीबॉल या दोन्हीही खेळांची जोपासना ती करते. शाळेमध्ये व्हॉलीबॉल टीममध्ये अग्रेसर आहे. तिच्या शिक्षिका डॉ. अवंतिका वर्मा तिला व्हॉलीबॉलसाठी योग्य मार्गदर्शन करतात. पण, क्रिकेट खेळायला मात्र शाळेत टीम नसल्यामुळे तिला सफायर या क्रिकेट क्लबमध्ये जावं लागतं. सफायरचे प्रशिक्षक समीर सहस्त्रबुद्धे तिच्याकडे विशेष लक्ष देतात. भवन्स त्रिमूर्ती नगर या शाळेतील बारा वर्षांची अवनी खेळाबरोबर अभ्यासामध्ये ९०% गुण मिळवते. बाल मित्रांनो, बघा ना वडील अभिजीत आणि आई सोनाली दोघेही वैद्यकीय व्यवसायात असताना अवनीला ते क्रिकेटसाठी आणि तिच्या आवडीसाठी प्रोत्साहित करतात. अवनीला खेळाबरोबर गणिताच्या शिक्षिका अपर्णा धनरे यांचं शिकवणं विशेष आवडतं कारण, त्या खूप छान समजावून सांगतात. झोपेत अवनीला क्रिकेटची स्वप्न पडतात. एम.एस.धोनी हा तिचा आदर्श आहे कारण, तीही फलंदाज आहे. फलंदाजी का आवडते? असं विचारल्यावर अवनीने सांगितलं की, निर्णय क्षमतेची कसोटी लागते. आलेला बॉल सीमा पार करायचा याचा निर्णय लगेच घ्यावा लागतो आणि म्हणून फलंदाजीच्या टेक्निकसाठी तिला भारताचा कर्णधार रोहित शर्माही आवडतो. सफायर क्लबमध्ये शाळा सुटल्यानंतर ती नियमित क्रिकेटचा सराव करते.

क्रिकेटच्या होणाऱ्या मॅचेसमध्ये सहभागी होते. आपल्याला क्रिकेटमध्ये प्राविण्य मिळवायचंय हे तिन्ही मनाशी निश्चित ठरवलेलं आहे. एवढंच नाही तर महिलांच्या इंडियन क्रिकेट टीममध्ये नक्कीच जाणार, अशी तिला खात्री आहे. अशी मोठी महत्त्वाकांक्षा जपणारी, त्याकरता सातत्याने प्रयत्न करणारी आणि तिचे आई-वडील त्यासाठी तिला प्रोत्साहित करणारे या सर्व फुलाडी कुटुंबाला तरुण भारत छोटे उस्ताद शुभेच्छा देतो.

# दर्शन



ऑस्टिनचे नवीन व्यंकटेश्वर मंदिर

सायली मोकाटे-जोग / +१(८१८) ६२०-७११९

लहान वयात तिरुपतीच्या सहलीला जायचो तेव्हा धमाल यायची. रेल्वेने निघालो की, आधी मराठी, कन्नड आणि नंतर तेलुगू भाषेत स्टेशनवरच्या पाट्या दिसायला लागायच्या. वेगवेगळ्या लिप्यांमधली ती अक्षरे, त्यांचं वाचन, लेखनाचा प्रयत्न हा गमतीदार खेळ चालायचा. रात्री दीड-पावणेदोनच्या सुमारास रेणुगुंटा जंक्शन यायचे. सकाळी लवकरच निघून, तिरुपति ते तिरुमला असे सात डोंगर पायी चढून जायचे असायचे. सामान बसने पाठवून द्यायचे. पहिला डोंगर चढा आणि कठीण! लिंबूपाणी, ताक, फळे यासोबत निघालेले आम्ही तिथल्या भाविकांसारखेच 'व्यंकटरमणक्के गोविंदाऽ गोविंदाऽ गोईंदाः' असा गजर करत, या टोकापासून त्या टोकाकडे तिरपे चालत पायऱ्या चढायचो. त्याने दम कमी लागायचा. पुरुषांसह अनेक स्त्रियाही चकोट केलेल्या दिसायच्या. एकटी माणसे, बोचकीबाचकी घेऊन निघालेली लेकुरवाळी कुटुंबं, अगदी जख्खड म्हाताऱ्या व्यक्तीही काठ्या घेऊन दर्शनाला निघालेल्या! उतरणारे वेगात असायचे. आम्ही एकेक टप्पा पार करत, घामेघूम होत पहिला डोंगर सर करायचो. तिथल्या इडलीच्या ठेल्यावर गरमागरम जेवण आणि थोडी विश्रांती!

पुढे निघालो की, एकेक डोंगर मोजत चालायचे. मंद वारा वाहायचा. सपाट रस्ता आणि पायऱ्या कमी असायच्या. त्या भागात बाजूला भरपूर हरणं, मोर, इतर वन्य पशुपक्षी दिसायचे. वाटेत बालाजींची अनेक गाणी, स्तोत्रं लागलेली ऐकू यायची. हळूहळू हवेत किंचित गारवा जाणवायला लागायचा. सातवा डोंगर लागायच्या अलीकडे, रस्त्यात भरपूर लाल तोंडाची माकडं दिसायची. त्यांच्या मर्कटलीला बघून हास्यतुषारात चालण्याचा थकवा कुठल्याकुठे पळून जायचा. एकदा का वर, तिरुमलाला पोहचलो की, रामबागला उतरायची खोली असायची. मग, गरम पाणी मागवून त्या बादलीत पाय सोडून बसायचे. तो उरलेला दिवस आराम करून घ्यायचा. दुसऱ्या दिवशी ब्रह्ममुहूर्तावर उठून दर्शनाला निघायचे.

पहाटे साडेचार-पाचला दर्शनाच्या रांगेत प्रवेश घेतल्यानंतर खोल्यांमागून खोल्या आणि बोळ पार करत अखेर सकाळी साडे आठ-नऊच्या सुमारास आम्ही भव्य बालाजी मंदिराशी पोहचत असू. सुवर्णमंडित गरुडध्वज, मंदिरातील लक्षवेधक कोरीव काम, फुलमाळा, स्वर्णजडित स्थापत्य, शिल्पकला, भली मोठी हुंडी, बालाजींचा वाहून जाणारा श्रीमंती थाट, हुंडीत जमा झालेल्या पैश्यांचे वर्गीकरण करणारे देवस्थानचे कर्मचारी, चाळणीतून नाणी चाळणारे आणि नोटांचे वेगवेगळे गठ्ठे करणारे! कुणी पैशाच्या अख्ख्या सुटकेस ओतलेल्या असत. कुणी दागिने, मौल्यवान भांडी, रत्ने वाहिलेली असत. त्या साऱ्याने अचंबित होत लोखंडी जाळ्या लावलेल्या, त्या रांगेतून मग दीर्घ प्रतिक्षेनंतर आम्ही साक्षात बालाजींच्या दर्शनासाठी सज्ज होत असू. गर्भगृहाशी प्रत्यक्ष मूर्तीपुढे उभे राहिलो की, तो क्षण सारी गडबड, कोलाहल गळून पडायचा, जणू कानांत घंटानाद व्हावा. जेमतेम अर्धा एक मिनिटाचं ते दर्शन! पुजारी 'पुढे चला' म्हणून इशारा करायचे. देवावर नजर खिळवून, मूर्ती दिसत राहील तिथपर्यंत उलट चालत बाहेर पडायचं नि पुन्हा एकदा बाहेरून दंडवत! त्यानंतर, प्रसादाचा खास कापुरी स्वादाचा तिरुपति बालाजी स्पेशल जम्बो बुंदी लाडू आणि दहीभात! मनात कुठलीही शंका न येता, त्या लाडवाचा श्रद्धेने आम्ही आस्वाद घेत असू.

परतीच्या तिरुमलाहून तिरुपतिकडे खाली उतरणाऱ्या बस हा एक साहसी प्रवास असायचा. प्रत्येक वळणाला करकरून ब्रेक वाजायचे. एक क्षण उशीर झाला असता तर काय झाले असते हे खालची दरी बघून दिसायचे. दोन-सव्वा दोन तासांत सुखरूप तिरुपतीला पोहचलो की, मग पद्मावती आणि बालाजींची संपत्ती मोजून मोजून दमलेला व ते मापच डोक्याखाली घेऊन विसावलेला गोविंदा यांची मंदिरे! निघण्याआधी शर्यत लावून दाक्षिणात्य अनलिमिटेड थाळी! तो केळीच्या पानावरचा भाताचा डोंगर सर करून मग आमची स्वारी पुन्हा रेल्वेने घराकडे!

ऑस्टिनमध्ये साई मंदिराच्याच बाजूला व्यंकटेश्वर टेम्पल होणार, अशी काही वर्षांपूर्वी बातमी आली तेव्हा खूप आनंद झाला. वर्ष-दोन वर्षे अधिक त्याचं बांधकाम, देवळासाठी मागवलेले दगड, भारतातून आलेले खास कारागीर, पुजारी इत्यादी बातम्या वाचत-ऐकत होतो. अखेर सर्व कार्य संपन्न होत, जून २०१४ च्या सुमारास बालाजी मंदिर सर्वांसाठी खुलं झालं. मंदिर घरापासून २० ते २५ मिनिटांच्या अंतरावर! आम्ही दर्शनासाठी गेलो. गेल्या अनेक वर्षांत तिरुपतीला जाणं झालं नव्हतं. तिरुमला देवस्थानच्या बालाजीचं केवळ मिनिटभर मिळणाऱ्या दर्शनाचं डोळ्यांत साठवलेलं ते रूप! इथल्या मंदिराबाहेर तसाच सोनेरी गरुडध्वज फक्त छोट्या आकाराचा! घंटा लावलेल्या, सुंदर नक्षीकाम केलेल्या लाकडी, मोठ्या प्रवेशद्वारातून मंदिराच्या आत गेलो. सभोवती सर्व देवीदेवतांची एकेक मंदिरे सजलेली दिसत होती आणि थेट समोरच्या दगडी, सुबक कलाकृती साकारलेल्या, नंदादीप, समया-दिव्यांनी उजळलेल्या गाभाऱ्यात उभा धीरगंभीर, मनोहारी व्यंकटेश! उत्तम साज, आरास, सजावट! गाडीतून उतरल्यापासून अवघ्या पाचच मिनिटात आम्ही या बालाजींपुढे उभे होतो. मनात का कुणास ठाऊक पण चुकचुकल्याची भावना!

बऱ्याच वर्षांपूर्वी पहिल्यांदा पंढरपूरला गेले होते. दोनअडीच तास रांगेत उभं राहून विठोबारखुमाईचं दर्शन घेऊन बाहेर पडलो. त्यादिवशी, शेजारची धर्मदर्शनाची रांग चार अधिक तास लांब होती एवढी गर्दी! नंतर पुन्हा गेलो तेव्हा सोबत वडिलांचे मित्रवर्य! ते त्यावेळी सोलापूरचे डिस्ट्रिक्ट जज! ऐन वारीची वेळ असतानाही थेट व्हीआयपी रांगेतून १०-१२ मिनिटात मंदिरात विनासायास प्रवेश! त्यावेळी, मात्र विठोबासमोर उभे राहूनही मनात अशीच काहीशी चुकचुकल्याची भावना! दर्शन घेऊन आम्ही बाहेर पडत होतो. मागाहून विठुरायाचे नाम घेत, वारीतून पायी चालत आलेला धर्मदर्शनाच्या ओसंडून वाहत असलेल्या रांगेतला एक वारकरी...'भेटला गो माझा इठ्ठल...इठ्ठला' आर्त हाक घालणाऱ्या त्या पांडुरंगभक्ताने विठ्ठलरखुमाईच्या चरणांना कवटाळले आणि भक्तिरसाने पूर्ण माथा टेकवला.

त्या आठवणीने लख्ख प्रकाश पाडला. माझे डोळे आपसूक मिटले. चौदा-पंधरा तासांचा रेल्वेचा प्रवास! रेणुगुंटाहून तिरुपती, वाटेतली हरणं, मोर, माकडं, ती स्तोत्रं, सात डोंगर पायी चढून तिरुमला, पहाटे उठून दर्शनाची लांब रांग, पायाखालचा परिचित दाक्षिणात्य दगड, चार एक घटकांच्या प्रतिक्षेनंतर दृष्टेत्पत्तीस पडणारा गरुडध्वज, मंदिर शिल्पं, हुंडी, सुवर्णकांती प्रवेशद्वार, पायाशी वाहते थंड पाणी, गाभारा आणि पुढ्यात... मी डोळे उघडले. ऑस्टिनच्या नवीन व्यंकटेश्वर मंदिरातले बालाजी मंद स्मित करीत सामोरी उभा होता.

# बंटीची बंडखोरी

(भाग २३)

प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२

इन्द्रप्रस्थ सोसाटीचं नाव, ज्याच्या त्याच्या तोंडी झालं. गणेशोत्सव स्पर्धेत मिळालेली ढाल आणि त्याच्या शेजारी आरोग्य खात्याकडून मिळालेला चषक दिमाखात चमकत होता. हळूहळू, साथीच्या रोगांची तीव्रता कमी होऊ लागली होती, बंटीच्या स्वच्छता मिशनने चांगलाच जोर धरला होता. सोसायटीचा, संपूर्ण परिसर स्वच्छ राहू लागला. प्रत्येकानं घराच्या खिडक्या, दारांना बारीक जाळ्या बसवून घेतल्या. जिने आणि लिफ्ट फिनाइलनं पुसले जाऊ लागले. दर रविवारी संपूर्ण परिसरात, डीडीटीची फवारणी होऊ लागली.

दरम्यान, आईला घरकामात मदत करण्याचं धोरण त्यानं सोडलं नव्हतं. शनिवारी जेवणं झाल्यावर बंटी ग्रुप टेरेसवर बसून गप्पा मारण्याचं कामही नेटानं पार पाडत होता. 'बंटी, यावर्षी टर्मिनल (सहामाही परीक्षा) एक्झाम्स दिवाळीच्या आधी आहेत. यंदा दिवाळी नोव्हेंबरच्या सुरुवातीला येतेय,' शिरीष म्हणाला.

'दिवाळीच्या सुट्या संपल्या की, डिसेंबर महिन्यापर्यंत सगळा पोर्शन संपेल. मग, जानेवारी महिन्यापासून फक्त रिव्हिजन आणि पेपर सोडवणे,' यशनं माहिती पुरवली.

'हो रे... आपण दहावीत आलो काय आणि बघता बघता दिवस पटापट निघून गेले काय! दिवाळी जवळ आली की, एका गोष्टीची आठवण होते. कसली सांगा?' बंटीनं विचारलं.

'फराळ?'

'नवे कपडे?'

'आकाश कंदिल?'

'रोषणाई?'

यश, शिरीष, स्वानंदनं विचारलं. 'हो... अगदी बरोबर! पण, आणखी एक जिव्हाळ्याची गोष्ट तुम्ही सगळेच विसरलात. सांगू? दिवाळीतला किल्ला,' बंटी म्हणाला.

''खरंच की! दिवाळीतला किल्ला... कुठला किल्ला करायचा?' स्वानंदनं विचारलं.

'यावर्षी प्रतापगड करू या. शिवाय, त्याच्याजवळ, जावळीचं जंगलही दाखवता येईल. यावर्षी मातीच्या किल्ल्यापेक्षा लाकडाचा किल्ला करू या म्हणजे टिकेलही,' बंटीनं सांगितलं.

'गुड आयडिया! पण, लाकडाचा किल्ला म्हणजे लाकूड, अधेसिव्ह, फेविकॉल लागेल, कटर, कात्र्या लागतील. शिवाय, प्रतापगडचे वेगवेगळ्या अँगलमधून काढलेले फोटो लागतील,' यशनं आपलं मत मांडलं. 'हो लागेल सगळं! गुगलवरून आपल्याला प्रतापगडचे सारे फोटो मिळतील. शिवाय माझे बाबा, आपल्याला प्लायवर डिझाइन काढून देतील. त्याप्रमाणे, कटिंग करता येईल,' बंटीनं हमी दिली. 'अजून दिवाळीला पुष्कळ अवकाश आहे. आतापासून तयारी करायची? किल्ला करायचा कुठे? ठेवायचा कुठे?' शिरीषनं विचारलं.

'सध्या आपल्या चाचणी परीक्षा झाल्या आहेत आणि टर्मिनलला वेळ आहे. पुढच्या महिन्यात अभ्यासामुळे वेळ मिळणार नाही. त्यामुळे, आताच किल्ला तयार करून ठेवला तर! फक्त तो नेहमीच्या जागेवर वेळेवर ठेवायचा. त्यावर चित्रं ठेवायची जावळीचं जंगल, हिंस्त्र प्राणी हा देखावा आयत्यावेळी करायचा. पटतंय का माझं बोलणं?' बंटीनं विचारलं.

'हो पटतंय. पण केव्हा, कुठे बसायचं? कोणाच्या घरी?' युगनं शंका काढली. 'माझ्या डोक्यात एक कल्पना आहे. आपलं तळघर आहे नं, जिथे सोसायटीची अवजारं, स्क्रॅप मटेरिअल ठेवलंय, तिथली जागा साफ करून तिथे बसता येईल,' शिरीषनं सांगितलं.

'बंटीऽऽ ६ एमएमचा प्लाय आणावा लागेल. आधी, मॉडेल म्हणून पुठ्ठ्याचा किल्ला बनवा. तो बरोबर जमला की, नंतर प्लाय कापायला सुरुवात करा. मी पुठ्ठा आणि प्लायवर डिझाईन काढून देतो,' बाबांनी सांगितलं. 'आणि जंगल म्हणून, थोडा मातीच्या ढेकळांवर धणे, गहू पेरून त्यांची पिकं तयार करा. नवरात्रीमधे जसं देवीसमोर शेत म्हणून गहू पेरतात तसंच! त्यातून अंकुर फुटून शेतं तयार होतील. तेच जंगल म्हणून वापरता येईल,' आईनं माहिती पुरवली.

प्रत्येकानं आपआपल्या घरातून पुठ्ठे जमा केले. प्लायची एक शीट विकत घेतली. अधेसिव्ह, कात्र्या, कटर आणि लहानमोठ्या खिळ्यांची जमवाजमव झाली. वॉचमन दादांकडून तळघराची किल्ली घेऊन, जागेची साफसफाई करून, एलईडी बल्ब, टेबल फॅन आणि जाड सतरंजी घेऊन कामाला सुरुवात झाली. दोनतीन दिवसात पुठ्ठ्याचा किल्ला तयार झाला देखील!

'बंटीऽऽ खरं तर आपले दादा, मदतीला आले असते तर, आतापर्यंत आपला प्लायचा किल्लासुद्धा झाला असता कारण, 'मेनी हँडस् मेक वर्क लाइट,' यश म्हणाला. 'खरं आहे पण, त्यांना कोणाला रविवारी आपल्यासारखा मोकळा वेळ नाहीये नं? आपण सगळे तर आहोत नं? आपला हात जगन्नाथ, खरं आहे की नाही?' बंटीनं विचारल्यावर सारे एकसुरात 'हो ऽऽ' म्हणाले.

पुठ्ठ्याचा किल्ला खूप सुरेख झाला होता. तो खाली सतरंजीवर ठेवून, प्लाय आणि सारं सामान, एका उंच कपाटावर ठेवलं.

शाळा, फुटबॉल, होमवर्क, स्कॉलर्स बॅच सारं व्यवस्थित सुरू होतं. शनिवारी संध्याकाळी अचानक आकाशात ढगांची दाटी झाली आणि मुसळधार पावसाला सुरुवात झाली. तासाभराने पाऊस थांबला. बंटी धावत तळघराकडे गेला. लॉक उघडलं आणि त्याला धक्काच बसला. तळघरात, गुडघ्याएवढं पाणी साठलं होतं.



पुठ्ठ्याचा किल्ला पूर्ण भिजून गेला, बुडला होता. सतरंजीसुद्धा भिजून बुडली होती.

बंटीनं सगळ्या ग्रुपला खाली बोलावून घेतलं. 'अरे देवा, हे काय झालं रे बंटी? आपला किल्ला तर बुडलाच पण, आता हे पाणी कसं काढायचं?' यशनं विचारलं. 'इथलं पाणी काढायचा, उपसायचा एकच उपाय आहे, वॉटर पंप! थोडंसं पाणी साठलं असतं तर, बादलीने काढलं असतं पण, हे तर गुडघ्याएवढं आहे. नशीब आपण प्लाय आणि सगळं सामान उंचावर ठेवल्यामुळे ते वाचलं,' बंटीने पॉझिटिव्ह थिंकिंग केलं. शिरीष जाऊन वॉचमनदादांना घेऊन आला. 'आपल्याकडे असा पंप नाहीये. आपले पंप सबमर्सिबल आहेत. बोअरच्या आत बसवलेत. सोसायटीच्या इलेक्ट्रिशियनला विचारू?' त्यांनं विचारलं.

'माझ्याकडे दुरुस्तीसाठी आलेला एक वॉटर पंप आहे. पण, अजून तो दुरुस्त झालेला नाहीये. मी प्रयत्न करतो. एक तासभर लागेल,' इलेक्ट्रिशियननं सांगितलं. नशिबानं, पंप लवकर दुरुस्त झाला. तोपर्यंत, बंटी ग्रुपच्या सर्वांचे आईबाबा जमले. प्रत्येकाला काळजी होती. इलेक्ट्रिशियन दादा आले, त्यांनी पंप सुरू केला. त्याचा आऊटलेट खालच्या बाथरूममध्ये घेतला. साचलेलं पाणी भराभर कमी होऊ लागलं. पूर्ण पाणी बाहेर गेल्यावर, बंटीनं सतरंजी, बाहेर वाळत टाकली. पुठ्ठ्याचा भिजलेला किल्ला, कचऱ्याच्या डब्यात टाकला. संपूर्ण खोली वाळण्यासाठी टेबल फॅन रात्रभर चालू ठेवला. रविवारी सकाळपर्यंत सारं पूर्वस्थितीत आलं. सारं कोरडं झालं होतं. बंटी ग्रुपनं प्लाय कापायला सुरुवात केली. सारे दादा मदतीला धावून आले. बघता बघता किल्ला पूर्ण झाला.

क्रमशः

## विष्णु मापारी, अरुण सोहनी, दिगंबर वाघ, संजय बोरसे यांचा गावकऱ्यांनी केला सत्कार



सोयगाव,दि.६ ऑक्टोबर - येथील समाजप्रबोधनकार तथा कृ.उ.बा.स सिल्लोड-सोयगाव पर्यवेक्षक विष्णु मापारी सोयगावकर यांना राजनंदिनी बहुउद्देशीय संस्था जळगाव खान्देश यांचे वतीने राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्कार २०२३-२४ नुकताच जळगाव येथे देण्यात आला.तसेच कोरोना काळात जिवाची पर्वा न करता अहोरात्र रूग्ण सेवा करणारे डिंगाबर वाघ,संजय बोरसे यांना आरोग्य दुत पुरस्कार तर युवा शेतकरी अरुण सोहणी यांना कृषी भूषण पुरस्कार काबरा फाऊंडेशन अध्यक्ष डॉ.महेंद्र काबरा,सेवा निवृत्त सैनिक सुरेश पाटील,कृषी तज्ञ विजय पराग,राष्ट्रवादी काँग्रेस जि. अध्यक्ष शालीकराम मालकर,अध्यक्षा संदिपा ज्ञानेश्वर वाघ यांचे उपस्थितित अल्पबचत भवन,जिल्हाधिकारी कार्यालयात जवळ जळगाव येथे पुरस्कार देण्यात आला. दुर्गादास केनेकर ह.भ.प.सुधन्वा महाराज केनेकर यांनी पेढे वाटून आनंद साजरा केला.

कृ.उ.बा.स.सिल्लोड सभापती केशवराव पाटिल तायडे, उपसभापती दारासिंग चव्हाण,संचालक तथा सोयगाव शिवसेना तालुकाप्रमुख प्रभाकर काळे,सचिव विश्वास पाटील, सर्व संचालक,उपसचिव,सुनिल गुजर,वैद्यकीय अधीक्षक डॉ.खंदारे,वानखेडे,कारके,विभागीय आयुक्त कार्यालयात छ.संभाजीनगर सुरे,नगराध्यक्षा आशाबी तडवी, उपनगराध्या सुरेखाताई काळे,नगरसेवक संध्या मापारी, गटनेता अक्षय काळे,गजानन कुडके,दिपक पगारे,राजेंद्र जावळे,राजु दुतोंडे,रऊफ देशमुख,राष्ट्रवादी शहराध्यक्ष रवींद्र काळे,काँग्रेस तालुका अध्यक्ष राजेंद्र काळे,भाजपा शहराध्यक्ष योगेश पाटील,दिलीप पाटील,रविंद्र काटोले,जेष्ठनेते शांताराम आण्णा देसाई,मयुर मनगटे, कृष्णा भैय्या जुनघरे,अंबादास जाधव,हितेश कुलकर्णी,शांताराम जोशी,जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव मुख्याध्यापक दादाराव राठोड,मुख्याध्यापक किरण पाटील, मुख्याध्यापक मोती जोहरे,माजी नगराध्यक्ष कैलास काळे,सुनिल गावंडे,वसंतराव बनकर,तुकाराम तायडे,अमोल मापारी,राजु सोनार,शेतकरी रमेश चौधरी,भरत काळे,डॉ.जनरल सर्जन जळगाव मोहन छाबडा,लताबाई कांबळे,जय भोले मित्र मंडळ नारळीबाग,शा.हरीभाऊ इंगळ,अनिल इंगळे,सुनिल सैंदाणे यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.

## जंगलातांडा येथे महीको कंपनीचे बाहुबली प्लस या वाणाचा कापूस पिक पाहणी कार्यक्रम संपन्न

सोयगाव,दि.६ ऑक्टोबर - तालुक्यातील जंगलाततांडा येथील प्रगतशील शेतकरी मदन चव्हाण यांच्या शेतात रविवार रोजी हा कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमांमध्ये महिको कंपनीच्या बाहुबली प्लस, आणि बाउन्सर ७३५१ गोल्ड,महाराजा तसेच रब्बी स्पेशल मक्का ४०६५ व नवीन गहू वाण विक्रांत या वाणाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली या कार्यक्रमासाठी महिको कंपनीचे रिजनल मॅनेजर हर्षद बोंडाळे व टेरिटरी मॅनेजर दिनेश प्रधान हे उपस्थित होते.या कार्यक्रमांमध्ये मदन चव्हाण शेतकरी व सोयगाव शहरातील कृषी भुषण शेतकरी अरुण सोहनी,वसंत चव्हाण,कैलास राठोड यांनी चांगले उत्पन्न घेतल्यामुळे त्यांना सन्मानित करण्यात आले.तसेच नुकताच कृषीभुषण पुरस्कार संन्मानित अरूण सोहणी यांचा सत्कार हर्षद बोडाळे यांनी केला व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिकोचे तालुका प्रतिनिधी सतीश बोडखे यांनी मेहनत घेतली तसेच या कार्यक्रमासाठी सोयगाव तालुक्यातील विविध भागातून अनेक शेतकरी आणि विक्रेते उपस्थित होते.




## एमजीएममध्ये कायदे विषयक एकदिवसीय परिसंवाद यशस्वीपणे संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.६ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लिगल स्टडीज अँड रिसर्च आणि एमजीएम वृत्तपत्र विद्या आणि जनसंवाद महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एक्सप्लोरिंग दि क्रिमिनल लॉ अँड मिडिया : ए फोकस ऑन थ्री क्रिमीनल लॉ' या विषयावरील परिसंवादाचे विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. के.जाधव, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.वसंत साळुंके, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, संचालिका डॉ.झरताब अंसारी, कार्यक्रम समन्वयक ॲड.रिना मानधनी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. या परिसंवादाच्या उद्घाटनपर सत्रात मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व्ही. के.जाधव, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.वसंत साळुंके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पहिल्या सत्रामध्ये 'दि भारतीय न्याय संहिता, २०२३' या विषयावर डॉ. आनंद देशमुख, दुसऱ्या सत्रामध्ये 'दि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३' या विषयावर प्रा. डॉ. हकीम, तिसऱ्या सत्रामध्ये 'दि भारतीय साक्ष अधिनियम, २०२३' या विषयावर ॲड. जी.के. नाईक ठिगळे तर चौथ्या सत्रामध्ये 'मिडिया पर्स्पेक्टिव्ह ऑन थ्री किमिनल लॉ' या विषयावर ॲड.चैतन्य धारूरकर यांनी आपले विचार मांडले. या परिसंवादाचा समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून कायदेतज्ञ श्रीमती निरूपमा प्रताप हरदास आणि उच्च न्यायालयातील वकील ॲड. एस.के.कदम हे उपस्थित होते. या कार्यक्रमात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आभार प्रा. आशा देशपांडे यांनी मानले.

## कैलासला सासुरवास; 'पाणीपुरी' चित्रपटात सासू आणि जावयाची धमाल जुगलबंदी रंगणार

'जावई' म्हटल्यावर प्रत्येक मुलीचे आई-वडील त्याच्या मानपानाची काळजी घेतात. जावयाला काय हवं? काय नको? त्याला काही कमी पडायला नको यासाठी सासू-सासऱ्यांची कायम धडपड सुरू असते. अशीच एका घरातील सासू आणि जावई यांच्यातील धमाल जुगलबंदी आपल्याला पहायला मिळणार आहे. 'पाणीपुरी' या आगामी चित्रपटात अभिनेता कैलास वाघमारे जावयाच्या भूमिकेत तर त्याच्या खाष्ट सासूच्या भूमिकेत हरहुन्नरी अभिनेत्री विशाखा सुभेदार आपल्याला पहायला मिळणार आहेत. एस. के प्रॉडक्शन निर्मित आणि रमेश चौधरी यांचे लेखन-दिग्दर्शन असलेला 'पाणीपुरी' मराठी चित्रपट येत्या १५ नोव्हेंबरला चित्रपटगृहात दाखल होणार आहे. संजीवकुमार अग्रवाल या चित्रपटाचे निर्माते आहेत तर सहनिर्माते चंद्रकांत ठक्कर, अनिकेत अग्रवाल आहेत.

# सर्वसामान्यांच्या हितासाठी प्रामाणिक सेवा देणे महत्त्वाचे-पालकमंत्री अब्दुल सत्तार

छत्रपती संभाजीनगर,दि.६(जिमाका):- प्रशासकीय सेवेमध्ये मिळालेल्या पदाचा उपयोग सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी करावा. प्रशासनात सर्वसामान्यांच्या हितासाठी प्रामानिक सेवा देणे महत्त्वाचे असते,असे प्रतिपादन राज्याचे अल्पसंख्याक, औकाफ व पणन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहांमध्ये निवृत्त सचिव तथा छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण यांच्या कार्यावर आधारीत व गौतम कोतवाल लिखित 'जनमानसातील जिल्हाधिकारी' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी (दि.५) पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते झाले.

विभागीय आयुक्त दिलीप गावडे ,जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, गोदावरी पाटबंधारे महामंडळाचे मुख्य अभियंता विजय घोगरे, उपायुक्त जगदीश मिनीयार, डॉ.अनंत गव्हाणे, सुरेश बेदमुथा, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, एकनाथ बंगाळे, उद्योजक मुकुंद कुलकर्णी, हेमंत लांडगे, प्रसाद कोकीळ, घाटी रुग्णालयाच्या तत्कालीन अधिष्ठाता डॉ.वर्षा रोटे, माजी जिल्हाधिकारी तथा निवृत्त सचिव सुनील चव्हाण यांच्या पत्नी कांचन चव्हाण व परिवार तसेच प्रशासनातील अधिकारी कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

पालकमंत्री सत्तार म्हणाले की, सुनील चव्हाण यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी केलेले विविध क्षेत्रातील काम व योगदान हे उल्लेखनीय आहे. याची दखल शासन स्तरावर होणे आवश्यक आहे. लेबर कॉलनी येथील अतिक्रमण काढणे हे काम विशेष. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी केलेली मदत. केशर आंबा निर्यात व बाजारपेठ उपलब्धतेसाठी केलेले प्रयत्न, क्रीडा विकासासाठी संथेटीक ट्रॅक,कृषी अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये जिल्ह्याला देशांमध्ये प्रथम क्रमांक, ऐतिहासिक वास्तूचे जतन व संवर्धन, अग्नीवीर सैन्य भरती यासह विविध क्षेत्रातील काम हे जिल्हा प्रशासनाचे एक जबाबदार अधिकारी म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी केली, असे गौरवोद्गार श्री. सत्तार यांनी काढले. कोविड कालावधीमध्ये सुयोग्य नियोजनामुळे जिल्हा प्रशासनाचे काम उल्लेखनीय ठरले.

आपले मनोगत व्यक्त करतांना सुनील चव्हाण म्हणाले की, जिल्हाधिकारी म्हणून छत्रपती संभाजी नगरमध्ये काम करताना सर्व प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी यांनी एक टीम म्हणून काम केले. समन्वय आणि सहकार्याच्या जोरावर विधायक आणि सकारात्मक गोष्टी करू शकतो, त्याचा अनुभव मी इथे घेतला. मराठवाड्याविषयी विशेष आपुलकी असल्याने छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारीपदाचा कार्यकाळ माझ्यासाठी खूप महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. पुस्तक स्वरूपातून केलेल्या कामाच्या नोंद या पुस्तकाच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे, वाचनातून माणूस समृद्ध होत जातो, तर वाचनासाठी पुस्तक खूप महत्त्वाची असल्याचे यावेळी त्यांनी विशेष नमूद केले.

सुनील चव्हाण यांचे सहकारी तथा प्रशासनातील विविध अधिकारी यात.विजय घोगरे डॉ. अनंत गव्हाणे उद्योजक,मुकुंद कुलकर्णी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सय्यदा फिरासत. विविध क्षेत्रातील त्यांचे सहकारी यांनी यांच्या विषयी आठवणींना उजाळा दिला.

## शालेय जिल्हा क्रिकेट स्पर्धेत पुर्णा, सेलू, जिंतूर, परभणी वर्चस्व

सेलू (शिवाजी आकात) क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय परभणी व श्रीराम प्रतिष्ठान सेलू यांच्या वतीने शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा सेलू येथील नूतन महाविद्यालयाच्या मैदानावर दि. ४ ते ६ ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आल्या. सदरील क्रीडा स्पर्धेत १४/१७/१९ वर्षे आतील मुले मुली गटात ३८ संघांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन पोलिस निरीक्षक दिपक बोरसे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी श्रीराम प्रतिष्ठान सेलू अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, प्रमुख उपस्थिती क्रीडा अधिकारी रोहन औढेंकर, डॉ. प्रविण जोग, राष्ट्रीय क्रिकेट खेळाडू संदिप लहाने, गणेश माळवे, प्रास्ताविक तालुका क्रीडा संयोजक प्रशांत नाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष मोहकरे,प्रा नागेश कान्हेकर, यांनी आभार मानले मानले.

**स्पर्धेतील अंतिम निकाल**

**१९: वर्षे मुले :** १) विलासराव देशमुख उर्दु मा. उच्च शाळा जिंतूर:-प्रथम २) शांताबाई नखाते मा. उच्च मा. शाळा (आश्रम शाळा) वालूर (द्वितीय)

**१७ वर्ष मुले :** १) पोदार इंटरनॅशनल धर्मापुरी, परभणी :-प्रथम २) न्यु इरा सेकंडरी स्कुल जिंतूर :-द्वितीय

**१४ वर्ष मुले :** १) ज्ञानतिर्थ विद्यालय सेलू :-प्रथम २) विलासराव देशमुख उर्दू शाळा जिंतूर: व्दितीय ३) खान अब्दूल गफार खान मानवत: तृतीय

**मुली * १९ वर्ष :** १) गुरुबुध्दी महाविद्यालय पूर्णा... प्रथम २) सामेश्वर मा. उच्च, मा. धर्मापूरी परभणी : व्दितीय १७ वर्ष मुली :के. जी.बी.व्ही पूर्णा:प्रथम २) जवाहर विद्यालय जिंतूर - द्वितीय

पंच प्रमुख राजेश राठोड,प्रमोद गायकवाड,चरणसिंग तंवर, राहुल घाडगे,जिशान सिद्दीकी, योगेश आदमे, शेख मोईन अलीम पठाण,शेख नावेद,भारत झोडग आदित्य आडळकर,दिपक जोरगेवार,दिपक निवळकर, अक्षय खीळकर,गजानन शेलार

## क्रीडा स्पर्धेतून जिवन मूल्ये विकसित होतात : पो.नि.दिपक बोरसे

### जिल्हा शालेय क्रिकेट स्पर्धेला प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

सेलू : खेळ हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग असून खेळामधुन जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम, यश, अपयश, टिका, कौतुक, बलोपासना,आरोग्य ही जीवनमूल्ये विद्यार्थांच्या अंगी विकसित होतात त्यामुळे प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्यांना मैदानावर खेळवण्यासाठी पाठनावे असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक दिपक बोरसे यांनी केले.



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय परभणी व एल के आर आर प्रिन्स इंग्लिश स्कूल सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने नूतन महाविद्यालयाच्या मैदानावर शुक्रवार ४ आक्टोबर रोजी आयोजित जिल्हा शालेय क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करताना उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडाधिकारी राहूल औंढेकर, आंतरराष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक रासकटला, प्रा. नागेश कान्हेकर, हुलगिरे, सय्यद सिद्दिकी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालूका क्रीडा संयोजक प्रशांत नाईक, सुत्रसंचालन सुभाष मोहकरे, तर प्रा. नागेश कान्हेकर यांनी आभार मानले.

सामनाधिकारी म्हणून राजेश राठोड, प्रमोद गायकवाड, कपिल ठाकूर, झिशान सिद्दिकी,योगेश आदने,भरत घांडगे, रामा गायकवाड, प्रा रवी दवे, कैलास टेहरे,अमर सुरवसे,आदित्य आडळकर,नाविद शेख आदींनी परीश्रम घेतले जिल्हा भरातून १७ वर्षे वयोगटातील १४संघांनी सहभाग नोंदवला.

## देवगिरी अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात जागतिक स्वैच्छिक रक्तदान दिन संपन्न

छत्रपती संभाजीनगर : देवगिरी अभियांत्रिकी व व्यवस्थानशास्त्र महाविदयालय छत्रपती संभाजीनगर येथे जागतिक स्वैच्छिक रक्तदान दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ३५० प्राध्यापक व विदयार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने सहभाग घेऊन रक्तदान केले. महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. एस. व्ही. लहाने यांच्या हस्ते फित कापुन शिबिराचे उदघाटन करण्यात आले. रक्त संकलन करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर मधील लायन्स ब्लड बॅंकचे श्री. श्याम सोनवणे, श्री. सत्यसाई ब्लड बॅंकचे श्री. महेंद्रसिंग चव्हाण व संजीवनी ब्लड बॅंकचे डॉ. महेश गर्जे याचा सहभाग होता.

रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचवले जाऊ शकते, रक्तदान हे जगातील सर्वश्रेष्ठ दान असुन सर्व प्राध्यापक व विदयार्थ्यांनी रक्तदान करुन मानवधर्माचे पालन



करावे असे आवाहन करण्यात आले. तसेच विविध आजार व अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने रक्तांची आवश्यकता भासते तरी सर्वांनी या सामाजिक कार्यात स्वयप्रेरणेने सहभाग घ्यावा असे प्रतिपादन केले.

शिबिरात रक्तदान केलेलल्या रक्तदात्यांचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळुंके, सचिव मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष श्री. शेख सलीम शेख अहमद, कोषाध्यक्ष श्री. किरण आवरगावकर, कार्यकारीणी सदस्य श्री. विश्वास येळीकर, श्री. प्रदीप चव्हाण, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुभाष लहाने, ट्रेनिंग ण्ड प्लेसमेंटचे डिन प्रा. संजय कल्याणकर, विभागप्रमुख डॉ. सत्यवान धोंडगे, डॉ. गजेंद्र गंधे, डॉ. सचिन बोरसे, डॉ. आरती वाढेकर, डॉ. सुगंधा नांदेडकर, डॉ. शोएब शेख, डॉ. रुपेश रेब्बा, प्रा. अमरसिंह माळी, श्री. अच्युत भोसले, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. शिबिराच्या आयोजनासाठी डॉ. सचिन अग्रवाल, डॉ. ऋषिकेश पाखले, प्रा. जावेद शेख, प्रा. विवेक बल्लाळ, प्रा. कृष्णा मर्द्रे वार, प्रा. भारत पवार, प्रा. तुषार उकिर्डे, प्रा. विशालसिंग चौहान व विदयार्थी स्वयंसेवक यांनी परीश्रम घेतले.

## रस्त्यावर कचरा टाकून महिलांचे आंदोलन



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ :- नगर परिषद स्वच्छता विभागाच्या वतीने परदेशीपुरा भागात स्वच्छता होत नसल्याने भागात प्रचंड अस्वच्छता बोकाळली असून याचा विरोध म्हणून महिलांनी मेन रोड वर कचरा टाकून न.प प्रशासनाचा तीव्र निषेध केला. यावेळी प्रशासक हे प्रभागतील अस्वच्छतेला जबाबदार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष जितू परदेशी म्हणाले.

मोठी लोकसंख्या असलेला भाग म्हणून परदेशीपुराकडे पाहिले जाते. परंतु याठिकाणी नाले सफाई तसेच कचऱ्याची सफाईच होत नसल्याने नागरिकांची कुचंबणा होत होती. परिसरातील दुर्गंधी असहाय्य झाल्याने शेवटी महिलांनी सराफा मार्केट मानसी रेडिमेड जवळ मेनरोडवर कचरा टाकून जवळपास दोन तास रस्ता बंद करून प्रशासनाचा निषेध केला.स्वच्छते विषयी लवकरच निर्णय नाही घेतल्यासआणखीन तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा महिलांनी दिला आहे. यावेळी पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी परिस्थिती हाताळली.

## पैठण तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत श्री स भू बालानगरचा दणदणीत विजय



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ६ ऑक्टोबर जिल्हा क्रीडा कार्यालय औरंगाबाद तर्फे घेण्यात आलेल्या पैठण तालुका क्रीडा स्पर्धेमध्ये श्री सरस्वती भुवन प्रशाला बालानगर च्या १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने जिल्हा परिषद प्रशाला धुपखेडा या संघाचा दारुण पराभव करत अंतिम सामन्यात विजय मिळविला व १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने ज्ञानदीप विद्यालय विहामांडवा यांचा पराभव करत अंतिम सामन्यात विजय मिळवला. अंतिम सामन्यांमध्ये दिव्या कधी काव्य गोरडे साक्षी चौधरी यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.या सर्व विजयी खेळाडूंचे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री शिरीष मोरे शालेय समिती अध्यक्ष सत्यनारायण सोनी व शालेय समिती सदस्य भास्करराव गोरडे तसेच परिवेक्षिका शीला पवार वैशालीतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करत जिल्हास्तरासाठी शुभेच्छा दिल्या या सर्व खेळाडूंना प्रशालेची क्रीडा शिक्षक संतोष शिंदे यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी पालक समितीचे शिवाजी गोरडे वसंत गोरडे बाबासाहेब अवसारे यांनी विजयी खेळाडूंची अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या १४ वर्ष विजय संघातील खेळाडू ऋतुजा जाधव आर्या गोरडे विद्या गोरडे साध्वी काळे प्रांजल गोरडे वैष्णवी कुठे दिव्या कदे काव्या गोरडे कल्याणी गोरडे शिल्पा पठाण आलिया पठाण अल्फिया सय्यद १९वर्षे मुलींच्या संघ वेदिका गोरडे सोनाली कर्डिले साक्षी चौधरी शुभांगी नलावडे भक्ती गोरडे मयुरी गोरडे प्रतीक्षा पडे अमृता बोंबले योगिता कोरडे सरिता भालेकर अंकिता ढोले आलिया पठाण हर्षदा गोरडे भक्ती गोरडे कल्याण हांडे यांचा सहभाग होता

## ओला इलेक्ट्रिकच्या स 'बॉस सेल' सुरुवात

छत्रपती संभाजीनगर, ५ ऑक्टोबर, २०२४: भारतातील सर्वात मोठी प्युअर-प्ले ईव्ही कंपनी, ओला इलेक्ट्रिक, सर्वात मोठा ओला सीझन सेल, बॉस लाँच करत आहे. या सेलमध्ये एस १ पोर्टफोलिओ फक्त ४९,९९९ रुपयांना उपलब्ध आहे. ३७,००० रुपयांपर्यंतचे अनन्य डील आणि हायपरचार्जिंग क्रेडिट्स, मूव्हओएस+ अपग्रेड, क्सेसरीज आणि केअर+ वरील विशेष डील यासह अनेक आकर्षक ऑफर आहेत.



ओला च्या बॉस सेल मध्ये ओला एस१ एक्स २ केडब्लूएच ची किंमत रु. ४९,९९९ पासून सुरू होते (मर्यादित स्टॉकसाठी). एस १ पोर्टफोलिओवर रु. २५,००० पर्यंत, एस१ एक्स २ केडब्लूएच वर सपाट रु. २५,००० आणि एस १ पोर्टफोलिओवर रु. १२,००० पर्यंत सूट मिळणार आहे. तसेच ७,००० रुपयांची मोफत ८ वर्षे/८०,००० किमी बॅटरीची वॉरंटी मिळेल. ६००० रुपयांचे मोफत मूव्हओएस+ अपग्रेड, आणि ७,००० रुपयांचे मोफत हायपरचार्जिंग क्रेडिट मिळेल. तसेच या बॉस मध्ये ओला निवडक क्रेडिट कार्ड इएमआय वर ५,००० रुपयांपर्यंत फायनान्स ऑफर करत आहे.

## जीएसटी पोर्टलवर लाइव्ह

पुणे: आयडीएफसी फर्स्ट बँकेला वस्तू आणि सेवा कर ( जीएसटी ) पोर्टलसह त्यांचे एकत्रीकरण जाहीर करताना आनंद होत आहे, ज्यामुळे सीमलेस जीएसटी पेमेंट करता येईल. त्वरित पेमेंट पुष्टीकरण आणि डाउनलोड करण्यायोग्य चालानमध्ये सुलभ प्रवेशासह, ग्राहकांना आता सहज, त्रास-मुक्त पेमेंट अनुभवाचा फायदा होईल. हे नवीन एकत्रीकरण आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या ग्राहकांना बँकेच्या वापरकर्त्यासाठी अनुकूल रिटेल आणि कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्म आणि त्याच्या देशव्यापी शाखा नेटवर्कसह विविध डिजिटल माध्यमांद्वारे जीएसटी भरण्याची परवानगी देते.

# ८०० यात्रेकरू तीर्थयात्रेसाठी विशेष रेल्वेने अयोध्येकडे रवाना

## मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना ज्येष्ठ नागरिकांना आनंद देणारी- पालकमंत्री अब्दुल सत्तार

सिल्लोड दि. ०६, ( प्रतिनिधी ) :-तीर्थयात्रा ही ज्येष्ठ नागरिकांना आनंद देणारी बाब असते. शासनाने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरु करून ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, अशा शब्दात राज्याचे अल्पसंख्यांक औकाफ, पणन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी आज अयोध्येकडे रवाना झालेल्या तीर्थयात्रेकरुंना शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने अंतर्गत आज छत्रपती संभाजीनगर येथून ८०० जेष्ठ नागरिकांना घेऊन जाणारी जिल्हयातील पहिली रेल्वे अयोध्येकडे रवाना झाली. पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते व गृह निर्माण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर या यात्रेकरुंना निरोप देण्यात आला. पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी हिरवा झेंडा दाखवून रेल्वे मार्गस्थ केली.

यावेळी गृह निर्माण मंत्री अतुल सावे, आमदार विक्रम काळे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवडे, सहायक आयुक्त पांडुरंग वाबळे उपस्थित होते.

आज 'जय श्रीराम जय जय श्रीराम' च्या जयघोषात ८०० जेष्ठ नागरिक तीर्थ दर्शनासाठी विशेष रेल्वेने मार्गस्थ झाले.

पालकमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने अंतर्गत जिल्ह्यातून ही पहिली भाविकांची रेल्वे अयोध्येसाठी रवाना होते आहे. श्रीरामाचे दर्शन घेण्याची ही संधी या यात्रेमुळे आपल्या जिल्ह्यातील जेष्ठांना मिळते आहे. जेष्ठांना आनंद देणारी ही योजना आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून राज्य शासनाने सुरू केलेल्या योजनेचा लाभ राज्यातील अनेक शेतकरी, शेतमजूर व सर्वधर्मीय नागरिकांना होत आहे. राज्य शासनाचा हा क्रांतीकारी निर्णय आहे. छत्रपती संभाजीनगर ते प्रभू श्री रामांची जन्मभूमी आयोध्या या तीर्थयात्रेत सहभागी होणाऱ्या सर्व ज्येष्ठांना रेल्वेत सर्व सोई देण्यात आल्या आहेत असे सांगून त्यांनी यात्रेकरूंचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

### स्वागताने जेष्ठ भारावले

भगव्या पतका, फेटे, टोप्या, उपरणे परिधान केलेल्या प्रवाशांचे फुलांची उधळण व झेंडूच्या फुलांचे हार घालून रेल्वे स्थानकावर स्वागत करण्यात आले. अयोध्येला जाणारी विशेष रेल्वे फुलांच्या माळा आणि फुगे बांधून सजविण्यात आली होती. रेल्वे स्थानकावर आगमन होताच केलेले स्वागत पाहून जेष्ठ नागरिक भारावून गेले. अनेकांनी आयुष्यात पहिल्यांदाच अयोध्येला जात असल्याचे सांगत आनंद व्यक्त केला.

### रेल्वेत वैद्यकीय सुविधांची उपलब्धता

तीर्थयात्रेत सहभागी ज्येष्ठांसाठी रेल्वेत औषध, वैद्यकीय सुविधाही उपलब्ध करून दिल्या आहेत. जेष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी सामाजिक न्याय विभागाचे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. यावेळी अयोध्या साठी निघालेले नागरिक उपस्थित होते.

# ...पळाली सुधा स्वर्गलोकाकडे!

## प्रासंगिक

प्रकाश एदलाबादकर

*माझ्या मराठी मातीचा । लावा ललाटास टिळा*
*हिच्या संगाने जागल्या । दऱ्याखोऱ्यातील शिळा*
*हिच्या कुशीत जन्मले । काळे कणखर हात*
*जिच्या दुर्दम्य धीराने । केली मृत्यूवरी मात*
*रत्नजडित अभंग । ओवी अमृताची सखी*
*चारी वर्णातुनी फिरे । सरस्वतीची पालखी*
*माझ्या दरिद्री मातीचा । नका करू अवमान*
*हिच्या दारिद्र्यात आहे । भविष्याचे वरदान*
*नाही पसरला कर । कधी मागायास दान*
*स्वर्णसिंहासनापुढे । कधी लवली न मान*
*माझ्या मराठी मातीचा । लावा ललाटास टिळा*
*हिच्या संगाने जागतील । मायदेशातील शिळा*

एका तपाच्या अथक प्रयत्नांनंतर माझ्या, नव्हे आपल्या सर्वांच्या मायबोली मराठीला अभिजात भाषेचा सन्मान प्राप्त झाला आहे. हा अत्यंत आनंदाचा, अभिमानाचा आणि समाधानाचा क्षण आहे. या क्षणी आठवली ती कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या प्रतिभेतून अवतरलेली वरील कविता. आज प्रत्येकच मराठी भाषकाच्या ललाटावर अभिमानाचा टिळा लागलेला आहे. मराठी मायबोलीला हा सन्मान प्राप्त व्हावा म्हणून कुणी आणि कसे प्रयत्न केले, त्यासाठी किती निवेदने दिली, किती पुरावे सादर केले, शासनाच्या दरबारी किती अर्ज-विनंत्या केल्या, मराठी भाषेच्या अस्तित्वासाठी आणि सन्मानासाठी कार्य करणाऱ्या अनेक संस्थांनी आणि व्यक्तींनी आपली वाणी, करणी आणि लेखणी कशी झिजवली हा इतिहास आता अख्ख्या मराठी जगताला ठावूक आहे. प्रत्येकाच्या वाटा आणि मार्ग कदाचित वेगवेगळे असतील परंतु, ध्येय मात्र एकच होते आणि ते म्हणजे मराठीला अभिजात भाषेचा सन्मान प्राप्त करून देणे. या सर्व प्रयत्नांचा एकसमयावच्छेदेकरून परिणाम झाला आणि घटस्थापनेच्या मुहूर्तावर, शारदीय नवरात्रीच्या पहिल्या माळेला मराठी मायबोलीच्या गळ्यात अभिजाततेच्या सन्मानाची माळ पडली. घटस्थापना म्हणजे आद्य संत कवयित्री मुक्ताबाईचा जयंतीदिन! हा सुद्धा एक योगायोगच म्हणावा लागेल ! 'चिंता क्रोध मागे सारा, ताटी उघडा ज्ञानेश्वरा' असे आर्जव करणाऱ्या मुक्ताबाईच्या हाकेला शेवटी केंद्र सरकारने प्रतिसाद दिला आणि ताटी उघडली. मराठीला सन्मानपूर्वक आत घेतले आणि तिचा सन्मान केला.

अभिजात भाषेचा सन्मान तर मिळाला पण आता मराठी भाषक म्हणून आपली जबाबदारी वाढलेली आहे. हे प्रत्येक मराठी भाषकाने लक्षात घ्यायला हवे. आपल्या भाषेविषयीची आत्मीयता, तिचा सन्मान, तिचा आदर आणि तिचा वापर आपल्या रोजच्या व्यवहारात झाला पाहिजे. आज सर्वत्र इंग्रजी भाषेचे स्तोम माजलेले दिसते. त्या भाषेला विरोध असण्याचे काही कारण नाही, परंतु त्यापायी आपल्या मातृभाषेकडे दुर्लक्ष करणे हा मात्र अक्षम्य अपराध मानायला हवा. एकीकडे अभिजाततेचा सन्मान आणि दुसरीकडे ही दुरवस्था हे चित्र पुसले गेले पाहिजे. आजची तरुण पिढी, विशेषतः शाळेपासून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंतची पिढी मराठीपासून दूर गेल्यासारखी झालेली आहे. त्या पिढीला परत आपल्या मायबोलीकडे वाळविणे आवश्यक झालेले आहे. मराठी भाषेची थोरवी अनेक साहित्यिक, लेखक, समीक्षक, कवी यांनी वेळोवेळी सांगितलेली आहे. परंतु, ही थोरवी आणि हे महत्त्व आज केवळ लिखाणापुरते किंवा साहित्य संमेलनामधील चर्चा-परिसंवादांपुरतेच शिल्लक आहे की काय, अशी साधार भीती वाटते.

एक बाब प्रकर्षाने लक्षात घेतली पाहिजे की, भाषा हे परस्पर संवादाचे प्रभावी माध्यम आहे. आपल्या मनात विचार येतात. ते एखाद्या व्यक्तीला किंवा समूहाला बोलून दाखविण्याची मनात इच्छा निर्माण होते. परंतु यासाठी माध्यम आवश्यक असते. हे माध्यम म्हणजेच भाषा. आपले बोलणे, विचार करणे, लिहिणे हे सर्व भाषेच्या माध्यमातूनच होत असते. इतकेच नव्हे तर एखाद्या विषयाच्या अभ्यासासाठीही भाषेचाच आधार घ्यावा लागतो इतके महत्त्व आपल्या जीवनात भाषेला आहे. आणि या सर्व व्यवहारांसाठी आपली मराठी भाषा पूर्णतः संपन्न आहे. मराठी भाषेचा उगम कसा झाला हे सांगताना, श्रवण बेलगोळ येथील मूर्तीखालच्या शिलालेखाचे उदाहरण दिले जाते. गोमटेश्वराच्या मूर्तीखालच्या शिलालेखात श्री चावून्डराये करवियले असा उल्लेख साधारण बाराव्या शतकाच्या सुरुवातीस आहे. मराठीच्या उद्गमासंबंधी आणि तिच्या प्रारंभीच्या अस्तिवखुणांविषयी अशी अनेक उदाहरणे विद्वान अभ्यासकांनी नोंदविलेली आहेत.

मराठीला अभिजात भाषेचा सन्मान प्राप्त झाल्यानंतर तिच्या अभ्यास, संशोधन, विकासाची प्रक्रिया इत्यादींसाठी शासनाकडून काय मदत केली जाईल, त्यासाठी किती आणि कसा निधी मिळेल याचीही चर्चा झाली आहे. मुख्य मुद्दा आहे तो या निधीचा योग्य उपयोग होण्याचा. देशभरातील विद्यापीठांमध्ये मराठीच्या अध्ययन आणि अध्यापनाचा मार्ग आता मोकळा होईल असे सांगण्यात येते. परंतु दुसरीकडे खुद्द महाराष्ट्रातच मराठी भाषेचे हाल सुरू आहेत. मराठी माध्यमाच्या शाळा दिवसेंदिवस बंद पडत आहेत. याला पायबंद कसा घालणार? मराठी भाषा आणि संस्कृतीचे धडे योग्य रीतीने द्यायचे असतील तर आधी आपल्या समाजाचे मराठीपण टिकवणे महत्त्वाचे आहे. हे मराठीपण कशाने टिकून राहील आणि वृद्धिंगत होईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शासनाच्या शिक्षण विभागाने या प्रयत्नात आता गती आणणे गरजेचे आहे. परंतु या सर्व संबंधात केवळ शासनावर अवलंबून राहायचे, हे योग्य नाही.

महाराष्ट्रातील आणि बृहन्महाराष्ट्रातील नामवंत साहित्य संस्थांचे सुद्धा ते महत्त्वाचे काम आहे. किंबहुना मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार यासाठीच या संस्था निर्माण झाल्या आहेत. या साहित्य संस्थांच्या घटनेमधील मुख्य उद्दिष्टच मुळी मराठीचा प्रचार, प्रसार आणि विकास हा आहे. या पृष्ठभूमीवर सध्या साहित्य संस्था या विषयासंबंधाने काय करताहेत याचाही शोध घेणे आवश्यक आहे. केवळ प्रादेशिक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने आयोजित करून भाषिक विकास किती झाला याचाही गांभीर्याने विचार या संस्थांनी करणे गरजेचे आहे. संमेलनांचे उत्सवी स्वरूप कमी करून प्रत्येक संमेलनात भाषा विकासाच्या दृष्टीने पाऊले उचलली पाहिजेत. आता तर साहित्य संस्थांची या दृष्टीने जबाबदारी वाढलेली आहे. यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राजधानीत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा सन्मान मिळाल्यानंतरचे हे पहिलेच संमेलन आणि तेही थेट देशाच्या राजधानीत, असा अपूर्व योग आहे. त्याचा किती आणि कसा उपयोग मराठीच्या भल्यासाठी करून घ्यायचा याची पूर्वयोजना तयार पाहिजे. आज मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. परंतु ती यापुढे ज्ञानभाषा म्हणून विकसित झाली पाहिजे. त्यासाठी या क्षेत्रातील संबंधितांनी आता नव्या उमेदीने कामाला लागले पाहिजे.

मराठीला अभिजात भाषेचा सन्मान मिळाला नव्हता तरीही मराठी भाषेचा विकास होतच होता. मराठी भाषेतील दर्जेदार साहित्याने जगाला भुरळ घातली आहे, हे आपण विसरता कामा नये. मराठी भाषा टिकविण्याचे आणि तिला वैभव प्राप्त करून देण्याचे श्रेय बऱ्याच अंशी साहित्यिकांना जाते हे कुणीच नाकारणार नाही. मराठी साहित्यातील वैविध्य हा खरे तर स्वतंत्र लेखाचाच विषय आहे. मराठीच्या विकासाच्या वाटा साहित्याच्या मांडवाखालूनच जातात. त्यातही मराठीमधील संतसाहित्य हे मराठीचे अलंकार आहेत. आपली मराठी सर्वांगाने परिपूर्ण आहे. संत ज्ञानेश्वरांनीच ठणकावून सांगितले आहे...

*माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंही पैजा जिंके । ऐसी अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ (६-१४)*
*मूळ ग्रन्थिचिया संस्कृता । वरि मऱ्हाठी नीट पहातां । अभिप्राय मानिलिया चित्ता । कवण भूमी हें न चोजवे ॥ (६-४३)*
*मऱ्हाठियेचां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं । घेणें देणें सुखचिवरी । हों देईं या जगा ॥ (१२-१६)*

मराठी इतके सुंदर लिहीन की, मूळ कोणते आणि भाषांतर कोणते याची भ्रांती वाचकांना आणि श्रोत्यांना पडेल असे ज्ञानदेवांनी म्हटले आहे. तोच अमृताचा वारसा लाभलेली माझी मायबोली आज अभिजात भाषांच्या पंक्तीत बसली आणि खऱ्या अर्थाने वैभवाच्या शिरी बसली याचा अभिमान वाटतो. मराठी साहित्याच्या उन्नतीसाठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी आता उत्तम संधी उपलब्ध होतील. सामान्यजनांच्या समृद्धीसाठी आणि सुसंस्कारित मनांच्या जडणघडणीसाठी आणि पर्यायाने राष्ट्राच्या उभारणीसाठी भाषेचे महत्त्व या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. मराठी भाषेचा विचार करता अभिजाततेची ही राजमान्यतेची सुवर्णमुद्रा येणाऱ्या काळात मराठीचे भाग्य उजळेल यात शंका नाही. १९९५ साली परभणीला झालेल्या ६८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन समारंभ आज माझ्या डोळ्यासमोर उभा आहे. कविश्रेष्ठ नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनाच्या उद्घाटन समारंभात परभणीच्या कलावंतांनी डॉ. ना. गो. नांदापूरकर यांचे गीत सादर केले होते. ते शब्द आजही कानात रुंजी घालत आहेत.




*आम्ही मराठी हिचे पुत्र लोकी ।*
*कधी भ्यावयाचे मुळी ना कुणा ।*
*आकंठ प्यालो हिचे दुग्ध आम्ही ।*
*पहा रोमरोमांतुनी ह्या खुणा ॥*
*तोडा, चिरा दुग्धधाराच येती ।*
*न हे रक्त वाहे शरीरातुनी ।*
*माझी मराठी मराठाच मीही ।*
*असे शब्द येतील हो त्यातुनी ॥*
*मराठी असे आमुची मायभाषा ।*
*हिच्या कीर्तीचे तेज लोकी चढे ।*
*गोडी न राहे सुधेमाजी आता ।*
*पळाली सुधा स्वर्गलोकाकडे ॥*

अमृतापेक्षाही गोड असलेल्या मराठी मायबोलीचा सन्मान हा आपण सर्वांचा सन्मान आहे. ▮

९८२२२२२११५

# आजि सोनियाचा दिनु...

## चर्चेत

प्रा. बाळासाहेब मुरादे

महाराष्ट्राला संघर्ष केल्याशिवाय काही मिळत नाही, हे मराठी भाषेला मिळालेल्या अभिजात भाषेच्या दर्जामुळे सिद्ध झाले. केंद्र सरकारने मराठीबरोबरच पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांनाही अभिजात भाषेचा दर्जा दिला. त्यामुळे आता अभिजात भाषांचा दर्जा मिळालेल्या भाषांची संख्या अकरा झाली आहे. अभिजात दर्जा मिळाल्याने भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहर उमटली आहे.

कवी कुसुमाग्रजांनीच एकदा, मराठी भाषा मंत्रालयाच्या दारात फाटकी वस्त्रं नेसून उभी असल्याचं म्हटलं होतं. त्या मराठीला आता चांगले दिवस यायला हरकत नाही. अर्थात एखादा निर्णय झाला, म्हणजे लगेच भाषेचं वैभव वाढतं असं नाही. मुळातच मराठी ही अतिशय जुनी आणि अभिजात भाषा आहे. तिच्यावर आता राजमान्यतेची मोहर उमटली इतकंच. यापुढे मराठी भाषा वैभवसंपन्न बनून मंत्रालयाच्या दारात पैठणी नेसून उभी असलेली दिसावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असली, तरी हे स्वप्न साकार होण्यासाठी सरकारबरोबरच १३ कोटी मराठीजनांपैकी प्रत्येकाची ती जबाबदारी आहे. वेगवेगळ्या भाषा अवश्य शिकल्या पाहिजेत; परंतु अमृताहून अधिक गोड असलेली ही भाषा बोलण्यात आपल्याला कमीपणा वाटता कामा नये. भलेही प्रमाणित भाषा बोलता येत नसेल; परंतु बोली भाषेत तरी बोलण्याची सवय ठेवली पाहिजे. दाक्षिणात्यांसारखा कडवा भाषाभिमान नसावा; परंतु याचा अर्थ आपली भाषाच आपण सोडून द्यावी, असेही नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात, त्यात थोडा बदल करून भाषा घासावी, भाषा तासावी; परंतु भाषा बोलावी. भाषेला सौंदर्य असतं. भाषेला माधुर्य असतं. भाषेत गोडवा असतो. तिचं हे माधुर्य, गोडवा, सौंदर्य जपलं पाहिजे. वाढवलं पाहिजे.

महाराष्ट्राला संघर्ष केल्याशिवाय काही मिळत नाही, हे अभिजात भाषेच्या दर्जाबाबतही झालं. अर्थात सहजासहजी मिळणाऱ्या गोष्टींचं महत्त्वही नसतं. लढून मिळवलेली गोष्ट महत्त्वाची असते. अभिजात दर्जा मिळाल्याने भाषेच्या समृद्धीवर राजमान्यतेची मोहर उमटली आहे. अभिजात दर्जा असलेल्या भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी सुमारे २५०-३०० कोटी रुपये विविध माध्यमांतून अनुदान स्वरूपात मिळतात. भाषा भवन, ग्रंथ आणि साहित्यप्रसार, ग्रंथालये, देशभरातील विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषा प्रसार, अध्यासने, त्या भाषेतील विद्वानांसाठी पुरस्कार आदींसाठी आर्थिक पाठबळ मिळते. मराठी भाषा हा देशाचा अभिमान आहे. या उत्तुंग भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने देशाच्या इतिहासात मराठी भाषेचा समृद्ध सांस्कृतिक वारशाचे योगदान अधोरेखित झाले आहे. भारताच्या परंपरेत मराठी कायमच अत्यंत महत्त्वाची आहे. आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे अनेक अमराठी लोकांना मराठी भाषा शिकण्याची प्रेरणा मिळेल.

अभिजात भाषा भारताच्या पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करतात. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर त्याचं श्रेय घेण्याची स्पर्धा नेहमीसारखी सुरू झाली आहे. निवडणुकीचं टायमिंग साधून निर्णय झाल्याचं श्रेय घेऊन त्याचं मतात रूपांतर करण्याचा प्रयत्न होईलही; परंतु मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी दोन दशकं वाट पाहावी लागली. २००४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा द्यायला सुरुवात झाली. त्यानंतर आठ वर्षांनी देशातील जुन्या, सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा असलेल्या मराठीच्या अभिजात दर्जासाठी प्रयत्न सुरू झाले. कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देण्याचा अधिकार हा केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाला आहे. भाषेचा नोंदवलेला इतिहास हा अतीव प्राचीन स्वरूपाचा म्हणजे दीड-दोन हजार वर्षे जुना हवा, प्राचीन साहित्य हवं, जे त्या भाषकांना मौल्यवान वारसा वाटतं, दुसऱ्या भाषासमूहाकडून उसनी न घेतलेली अस्सल साहित्यिक परंपरा हवी, अभिजात भाषा ही आजच्या भाषेपेक्षा निराळी हवी, असे निकष त्यासाठी लावण्यात आले होते. तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगु, मल्याळम आणि ओडिया या भाषांना अभिजात भाषांचा दर्जा देण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये एकाही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला गेला नाही.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याचा संघर्ष हा आजचा नाही. मराठीच्या अभिजात दर्जाबद्दल संशोधन करून तसा अहवाल केंद्र सरकारला देण्यासाठी २०१२ मध्ये प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. २०१३ मध्ये या समितीने आपला अहवाल प्रकाशित केला. महारट्ठी-महरट्ठी-मऱ्हाटी-मराठी असा मराठीचा उच्चार बदलत गेला, असं या अहवालात म्हटलं आहे. महाराष्ट्री भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचं वय किमान अडीच हजार वर्षे जुनं असल्याचे पुरावे असल्याचं या अहवालात म्हटलं होतं. १३ कोटी लोकांची मराठी जगातली दहाव्या ते पंधराव्या क्रमांकाची भाषा आहे. तिच्या ऐतिहासिक प्रवासाचे संदर्भ देत आणि विविध शतकांमध्ये विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाचा विचार करून तिचं अभिजातपण स्वयंसिद्ध आहे, असंही या अहवालात म्हटलं होतं. 'गाथा सप्तशती' हा सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीचा ग्रंथ असून, पुढील काळात लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, तुकारामांची गाथा यासह अनेक समृद्ध ग्रंथांची परंपरा मराठी भाषेत निर्माण झाली. पतंजली, कौटिल्य, टॉलमी, वराहमिहिर, चिनी प्रवासी यूएन त्संग यांच्या लिखाणातील दाखले, ज्येष्ठ संशोधक श्री. व्यं. केतकर यांच्यासह अन्य संशोधकांचे अहवाल, जुन्नरजवळील नाणेघाटात आढळलेला ब्राह्मी लिपीतील सुमारे २२२० वर्षांपूर्वीचा शिलालेख यासह अनेक पुरावे सादर करण्यात आले. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देताना मराठीतल्या विवेकसिंधू, लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी या ग्रंथांचा आधार घेतला आहे. विवेकसिंधू हा ग्रंथ शके १११० मध्ये आद्यकवी मुकुंदराज यांनी रचला होता. हा मराठी भाषेतला पहिला ग्रंथ आहे. आद्यकवी मुकुंदराज हे मूळचे बीडचे. बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथे मुकुंदराजांनी विवेकसिंधू या ग्रंथाची रचना केली. ज्ञानेश्वर माउलींच्या जन्माच्या आधी मुकुंदराजांनी समाधी घेऊन ७५ वर्षे झाली होती. त्यांनी त्यांच्या विवेकसिंधू या ग्रंथामध्ये शंकराचार्यांच्या वेदांतावर निरूपणात्मक विवेचन केलं. या ग्रंथामध्ये एकूण १८ ओवीबद्ध प्रकरणं आहेत.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा, यासाठी एक तप पाठपुरावा, आंदोलन केल्यानंतर आता दर्जा मिळाला. अभिजात भाषांचा दर्जा मिळाल्यानंतर संस्कृत, तामिळ, कन्नड, तेलुगु या भाषांसाठी काही संस्था उभारल्या गेल्या आहेत तसंच या भाषांमधल्या प्रकल्पांना पाठबळ देण्यासाठी आर्थिक तरतूदही केली गेली. यात प्रत्येक भाषेसाठी दरवर्षी काही कोटी रुपये दिले होते. भाषा भवन उभारणे, त्या भाषेतील ग्रंथ आणि साहित्याचा प्रसार करणे, ग्रंथालये उभारणे, देशभरातील विद्यापीठे किंवा अन्य संस्थांमार्फत भाषेचा प्रसार यासह इतर प्रकल्पांसाठी आर्थिक पाठबळ दिलं जातं. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यास त्या भाषेतील विद्वानांसाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले जातात. 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर स्टडिज'ची स्थापना केली जाते. प्रत्येक विद्यापीठात त्या त्या भाषेचा अभ्यास करण्यासाठी विशेष केंद्र उभारलं जातं. हे आता मराठीच्या वाट्यालाही येणार आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे नोकरीच्या संधी वाढतील. विशेषतः सांस्कृतिक आणि संशोधन क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होतील. त्याचबरोबर संवर्धन, माहिती गोळा करणं, या भाषांमधील पुरातन साहित्याचं डिजिटायझेशन यामुळे भाषांतर, नोंद, विविध साहित्याचं प्रकाशन तसंच डिजिटल माध्यमात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. आता आपली मराठी बोलण्याची, वाचण्याची, पाहण्याची, जपण्याची आपली जबाबदारी वाढली आहे. मी मराठीसाठी काय करतो किंवा करते याचा विचार प्रत्येक व्यक्तीने करायला हवा. मराठी बोलीभाषा ही ज्ञानभाषा करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. राज्य शासनाच्या भाषा धोरणांमध्ये त्या स्वरूपाची शिफारस करण्यात आली आहे. विज्ञान-तंत्रज्ञान मराठीमध्ये आले आणि मराठी ही रोजगाराची भाषा होऊ शकली, तर तरुणाई आपोआप मराठीकडे वळेल. आपण आतापर्यंत मराठीची अक्षम्य हेळसांड केली आहे. ती दूर करून सुंदर आणि समृद्ध भाषेचा वापर करताना भाषेच्या अभिवृद्धीचा गोवर्धन उचलून धरणे ही सर्वांची जबाबदारी आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्ष राहिलेल्या प्रा. पठारे यांची प्रतिक्रिया अतिशय महत्त्वाची आहे. या निर्णयामुळे मराठी भाषकांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली, तरी पुष्कळ गोष्टी साध्य होऊ शकतील, असं ते म्हणतात. एक तपानंतर निर्णय झाला, आता या निर्णयामुळे मराठी पैठणी नेसून कशी मिरवेल, हे पाहणे ही आपली जबाबदारी आहे. ▮

# फडणवीसांमुळे वारकऱ्यांच्या आध्यात्मिक प्रवासाचे स्वप्न वास्तवात



***पालखी महामार्ग हा महाराष्ट्रातील एक पवित्र पालखी मार्ग आहे, जो भगवान विठ्ठल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विठोबाच्या भक्तांसाठी श्रद्धेचा मार्ग म्हणून खोलवर रुजलेला आहे. दरवर्षी वारकरी म्हणून ओळखले जाणारे लाखो भाविक या भव्य तीर्थयात्रेत सहभागी होण्यासाठी आणि आषाढी एकादशी साजरी करण्यासाठी २१ दिवसांमध्ये सुमारे २५० कि. मी. अंतर कापून भगवान विठ्ठल यांचे पूज्य निवासस्थान असलेल्या पंढरपूर वारीकडे लांबचा प्रवास करतात. ही यात्रा जगातील सर्वात जुन्या सामूहिक यात्रांपैकी एक आहे आणि त्याकडे लोकचळवळ म्हणून पाहिले जाते.***

फडणवीस मुख्यमंत्री असताना तीर्थक्षेत्र पर्यटनाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा विकास योजनेचा एक भाग म्हणून पालखी महामार्गाची कल्पना करण्यात आली होती. या योजनेत भाविकांना विना अडथळा आणि सुरक्षित मार्ग सुनिश्चित करण्यासाठी, पुणे आणि पंढरपूर दरम्यानच्या प्रवासाचा वेळ दोन तासांनी कमी करण्यासाठी, गर्दी कमी करण्यासाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी प्रमुख राष्ट्रीय महामार्गांचा समावेश होता. कृषी उत्पादने आणि स्थानिक उत्पादनांना मोठ्या बाजारपेठेत प्रोत्साहन देताना ग्रामीण भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाला चालना देण्याची कल्पनाही या योजनेत होती. या विकास योजनांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, कचरा विल्हेवाट प्रणाली, शौचालये आणि पावसाचे पाणी साठवणे यांचा आवश्यक घटक म्हणून समावेश करण्याचे आश्वासनही फडणवीस यांनी दिले आहे. त्यांनी हे सुनिश्चित केले की योजना केवळ बांधकाम-केंद्रित नसतील तर त्यात शाश्वततेचा दृष्टीकोन देखील असेल. मराठी संस्कृतीचे जतन करतानाच धार्मिक भावना आणि लोकांचे कल्याण यांना केंद्रस्थानी ठेवून हा फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक होता.

पालखी महामार्गाच्या निर्मितीपूर्वी, आशादी एकादशीसारख्या शुभ प्रसंगी वारकरींचा प्रवास अनेकदा दुर्दैवी अपघात, मृत्यू आणि असुरक्षित आणि गर्दीच्या मार्गांवरील जखमांद्वारे चिन्हांकित केला जात असे. मिरवणुकीदरम्यान त्यांच्या डिंडीला (गटाला) ट्रक आणि भरधाव वेगातील गाड्यांनी धडक दिल्याने वारकरींच्या अकाली मृत्यू झाल्याच्या अनेक बातम्या आल्या आहेत. यात्रेदरम्यान वारकरी लोकांची सुरक्षा, कनेक्टिव्हिटीचे प्रश्न आणि अपुऱ्या पायाभूत सुविधा हे अनेक वर्षांपासून तीर्थयात्रेच्या पर्यटनातील अधिकाऱ्यांसाठी एक मोठे आव्हान राहिले आहे.

मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्यासारखे मोजकेच लोक दीर्घकालीन, शाश्वत तोडगा काढण्याच्या दिशेने सक्रियपणे काम करत होते. परिणामी, या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महामार्ग प्रकल्पांची कल्पना केली गेली आणि नंतर केंद्र सरकारने त्यांना मंजुरी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंदाजे १२,२९४ कोटी रुपये खर्चाच्या १३ प्रकल्पांची पायाभरणी केली. यामध्ये २२१ किलोमीटर लांबीचा संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्ग (एन. एच. ९६५) आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्ग (एन. एच. ९६५ जी) यांचा समावेश आहे, ज्याचा अंदाजे खर्च अनुक्रमे ६,६९० कोटी रुपये आणि ४,४०० कोटी रुपये आहे, ज्यात दोन्ही बाजूंना 'पालखी' साठी समर्पित पदपथ आहेत. या प्रकल्पात मल्हारपूरम धील दळणवळणाला चालना देण्यासाठी अंदाजे १,१८० कोटी रुपये खर्चाच्या २२३ किलोमीटरहून अधिक पूर्ण झालेल्या रस्ते प्रकल्पांचाही समावेश होता. पुण्याहून प्रवास करणाऱ्या भाविकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला.

फडणवीस यांच्या धोरणांनी महाराष्ट्रातील मंदिरांची शहरे आणि आसपासच्या प्रदेशांच्या विकासासाठी सातत्याने भक्कम वचनबद्धता दर्शविली आहे, सार्वजनिक समस्यांचे निराकरण करताना पायाभूत सुविधांच्या प्रगतीला सांस्कृतिक संवर्धनाशी जोडले आहे. स्वतः भगवान विठ्ठल यांचे प्रखर भक्त असल्याने, फडणवीसांनी या प्रकल्पाकडे सहभक्तांची सेवा म्हणून पाहिले. मंदिराला भेट देण्याची आणि शतकानुशतके जुन्या सांस्कृतिक प्रथेची कदर करण्याची कोणतीही संधी फडणवीस कधीही सोडत नाहीत. नोव्हेंबर २०२३ मध्ये, कार्तिक एकादशीच्या निमित्ताने, ते मंदिरातील महापूजेला उपस्थित राहिले, मंदिराच्या जीर्णोद्धार कार्याचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांना त्यांच्या पाठिंब्याचे आश्वासन दिले. अलीकडेच, जुलैमध्ये, त्यांनी पुन्हा संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पाडुकाला भेट दिली आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखीमध्ये भाग घेतला, जे वारकरी संस्कृतीबद्दलचा त्यांचा आदर दर्शवते. भगवान विठ्ठलासमोर झुकून, फडणवीस हे सुनिश्चित करतात की ते त्यांच्या मुळांशी खोलवर जोडलेले राहतील आणि आध्यात्मिक आदर आणि प्रादेशिक प्रगती यांच्यातील संतुलनावर भर देत प्रदेशाच्या विकासाच्या गरजांसाठी वचनबद्ध राहतील. यावर्षी जुलैमध्ये आशादी एकादशीच्या पूर्वसंध्येला त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ते पंढरपूरपर्यंतच्या 'नमो एक्स्प्रेस या विशेष द्रुतगती रेल्वेचे उद्घाटन केले तेव्हा हे समर्पण स्पष्ट झाले. भक्तांसाठी वाहतूक आणि सुलभता सुधारण्याच्या फडणवीस यांच्या दृष्टीकोनाशी हा उपक्रम जुळला. हे प्रवासाची व्यवस्था सुव्यवस्थित करते आणि तीर्थयात्रेचा एकूण अनुभव वाढवते, ज्यामुळे दरवर्षी प्रवासाला सुरुवात करणाऱ्या हजारो भाविकांना फायदा होतो.

पंढरपूर वारी ही भक्तांसाठी दीर्घकाळापासून एक आध्यात्मिक यात्रा राहिली आहे, ज्यामुळे एक सखोल भावनिक संबंध निर्माण झाला आहे. मात्र, भाविकांनी सहन केलेल्या अडचणींकडे आधीच्या सरकारांनी बऱ्याच काळापासून दुर्लक्ष केले होते. या पवित्र मार्गाच्या निर्मितीद्वारे भक्तांचा विश्वास प्रकट करत फडणवीस यांनी आपली दृष्टी प्रत्यक्षात आणली आहे. त्यांच्या या उपक्रमाने या खडतर प्रवासाचे लाखो वारकरी लोकांसाठी एक आरामदायक अनुभवात रूपांतर झाले आहे. फडणवीसांच्या भविष्यातील दूरदृष्टीचे हे प्रमुख उदाहरण आहे.

लेखक : सुधांशू जोशी

## रविवारची पत्रे

### या देवी सर्व भूतेषु मातृ-रूपेण संस्थिता...

जगदंबेचा उत्सव वेगळ्या दृष्टीने बघणे गरजेचे वाटते. शैलपुत्रीपासून सिद्धिदात्रीपर्यंतची देवीची रूपे जीवनाला संपूर्ण वळण देणारी ठरतात. केवळ राक्षस आणि देवी यांचे तुंबळ युद्ध किंबहुना अन्य देवांनी देवीच्या विजयासाठी केलेली कठीण उपासना एवढाच भाग सप्तशतीच्या अध्यायांमध्ये मर्यादित नसून ७०० श्लोक सात जन्मांचे जीवन शुद्ध करतात. त्यासाठीची कर्मठ अशी उपासना अभिप्रेत आहे. कुळाचार, परंपरा आपल्या डोक्यावर वाडवडिलांनी ओझे ठेवले आहे, या भावनेने हे नवरात्र न करता श्रद्धेने मातेची सेवा करून जीवन उज्ज्वल करावे. भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे की, ज्यावेळी धर्माचा ऱ्हास होतो आणि सज्जनांवर दुर्धर प्रसंग ओढवतो, त्यावेळी मी अवतार घेतो आणि धर्माची पुन्हा स्थापना करतो. तशीच काहीशी वेळ सध्या जगात निर्माण झालेली आहे. हिंदू धर्माबद्दल हिंदू धर्मीचीच मंडळी अन्य धर्माचा बुरखा घालून स्वधर्माचा नाश करू इच्छितात. त्यांच्या उच्चाटनासाठी या नवरात्रात सर्वांनी मनापासून जगदंबेची आराधना करून हिंदुधर्मरक्षणार्थ विडा उचलावा. श्रद्धा नष्ट होऊ नये, परंपरा मोडू नये आणि अवास्तव वेळ लागू नये या सर्वांचाच विचार या धकाधकीच्या जीवनात होणे गरजेचे आहे. या पूजनात महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती ही जगदंबेची प्रासंगिक रूपे आहेत. अर्थात विशिष्ट गुणदर्शक असे मातेचे अंशावतार आहेत. बंगालमध्ये हा उत्सव राष्ट्रीय स्वरूपाचा मानला जातो. तमोगुण, रजोगुण आणि सात्त्विक गुणांचा मिलाफ या सेवेतून प्राप्त होताना दिसतो. या उत्सवात मूळ हेतू न विसरता उपासना घडावी. पूर्वी देव-दानव यांच्या युद्धप्रसंगी या त्रिगुणात्मक शक्ती देवींनी देवांचे म्हणजे सत्त्वगुणी व्यक्तींचे राज्य दानवांचा वध करून पृथ्वीवर आणि स्वर्गात घडवून आणले होते. तेव्हा त्यांचे निरंतर स्मरण राहावे आणि त्यांच्या उपासनेने इहलोकी अभ्युदय आणि परलोकी मोक्ष यांचा मार्ग स्पष्ट दिसावा, असा या उत्सवाचा मूळ हेतू आहे. महिषासुर, मधुकैटभ, शुंभ-निशुंभ अशा वृत्तीचे राक्षस या कलियुगात वावरत आहेत. त्यांच्या संहारासाठी जगदंबेची सेवा अगत्याची आहे. क्रूर व विवेकहीन दानव सर्व नीतिनियम बाजूला ठेवून जेव्हा अनन्वित कृत्ये करतात अशावेळी भगवंताला स्वतःचा व स्वतःच्या संस्कृतीच्या बचावासाठी जशास तसे वागून त्यांचा वध घडवून आणणे भाग पडते. शेवटी 'बुद्धिर्यस्य बलं तस्य' हेच तत्त्व सिद्ध होते. कधी कधी क्रूरकर्म्यांचा विजय होतोसुद्धा; परंतु सत्त्वगुण तमोगुणावर मात करून विजय प्राप्त करतोच. सध्याच्या काळात काही वेगळे घडते असे दिसत नाही. त्यासाठीच देवीची प्रत्येकाने प्रार्थना करावी, 'हे जगदंबे तू या पृथ्वीवर पुनः अवतार घेऊन ये आणि मानवताच नष्ट करू पाहणाऱ्या दानवांचा संहार कर.' देवीचे वचनही तसेच आहे;

*ॐ इत्थं यदा यदा बाधा दानवोत्था भविष्यति ।*
*तदा तदावतीर्याहं करिष्याम्यरिसंक्षयम् ॥*

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### आता काय करावं या शिक्षणाचं?

आजघडीला देशामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे. कित्येक वर्षांपासून अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत आहेत. वयाची ३० ते ३५ वर्षे उलटूनही हातात नोकरी नाही; ज्यामुळे अनेक तरुण निराश झाले आहेत. नोकरीसाठी संघर्ष करीत आहेत. निवडणुका तोंडावर असताना थोड्याफार प्रमाणात सरकार नोकरीची जाहिरात काढली जाते. पेपरफुटी किंवा दुसरा काही घोटाळा झाला की, परीक्षा पुन्हा घेतली जाते. भरती थांबवली जाते. या सर्वांमध्ये तरुण भरडला जातो. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांचे नुकसान होते. आज उच्चशिक्षण घेऊन ना नोकरी मिळत आहे, ना धड रोजगार मिळतो. अनेक तरुण-तरुणी उच्चशिक्षित असूनही रोजगाराअभावी त्यांना जीवन जगणे कठीण झाले आहे. शिक्षणाने माणूस सुशिक्षित होतो. सुशिक्षित असल्याने तर पोट भरत नाही. हातात रोजगार नसल्याने आर्थिक परिस्थितीने कमजोर होत आहे. तरुणांनी करावे तरी काय? एखादी भरती घेतली तरी त्यामध्ये जॉईन करायला दोन ते तीन वर्षे लावतात. नोकरी लागूनही जॉईन होईपर्यंत तरुण आपले घर सांभाळण्यासाठी शेतीची कामे करताना दिसतात वा कोणताही रोजगार करून पोट भरताना दिसतो. आता बघा, शिक्षक भरती १० ते १२ वर्षांपासून घेतली नव्हती. आता ३० हजार शिक्षक भरती घेऊ, असे सांगितले. आतापर्यंत १० ते १२ हजारच शिक्षक घेतले. बाकीची भरती तशीच रखडून ठेवली. यामध्येही शिक्षणसेवक पद आहे. १०-१२ वर्षांपासून अनेक विद्यार्थी भरतीची वाट बघत होते. त्यामध्येही तीन वर्षांसाठी शिक्षणसेवक पद ठेवले आणि सोळा हजार मानधन. बाहेरगावी राहून आपला आणि आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह कसा करायचा, हा प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षक देशाचा आधारस्तंभ असतो. मग आज शिक्षकांनाच सेवक बनवून ठेवले आहे, हे कितपत योग्य आहे. एवढ्या वर्षातून नोकरी लागली म्हणून आनंदही होत आहे. परंतु, एवढ्या कमी पगारात संसार चालवायचा कसा, असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. आपल्या भारतीय संविधानामध्ये दर्जाची आणि संधीची समानता दिली आहे. प्रत्येक नागरिकाला त्याच्या दर्जानुसार रोजगार दिले पाहिजे, असे सांगितले आहे. समान काम, समान वेतन असले पाहिजे. मग आज आपल्या देशात संविधानातील मूल्ये खरोखरच लागू करतात का? भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे, असे म्हणतात. आज लोकांचे प्रश्न खरोखरच सोडविले जात आहेत का? आज आपण बघतो की, लोकशाहीची पायमल्ली होताना दिसते आहे. आपले प्रश्न मांडण्यासाठी, आपले अधिकार आणि हक्क मिळविण्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकांनी समोर येण्याची गरज आहे. देशातील अनेक संघटना, पक्ष आणि लोकांनी मिळून लढले तरच आपल्याला न्याय मिळू शकेल. परंतु, शेवटपर्यंत एक प्रश्न निर्माण होतो की, आता या शिक्षणाचं काय करायचं?

**प्रीती खोब्रागडे**/७९७२२०३२९७

### पवार टोळीची वायफळ बडबड

भाजपाच्या नितीन गडकरींनी लाडकी बहीण योजनेवर बौद्धिक दिल्यानंतर राज्यातील सर्वपक्षीय पवार टोळीचा लाडकी बहीण योजनेवर आक्षेप(!) घेण्याचा जोर वाढलेला दिसतो. मी आर्थिकदृष्टीने शेतीप्रश्नी व्यक्त होणारा कार्यकर्ता असून समाजवादी डाव्या पठडीच्या हे द्या, ते द्या असल्या मागण्या आमच्यासारखे शरद जोशी विद्यापीठात शिकलेले कार्यकर्ते कधीच करीत नसतो. तरीसुद्धा या लाडकी बहीण योजनेवर हा प्रपंच करतो आहे. २०१४ साली सत्तेत आलेल्या देवेंद्र सरकारने आल्या आल्या आमचे सरकार गुंतवणूकधार्जिण्या गुंतवणूक धोरणांनीच शेतकरी, कामगार, महिला, तरुण व इतर घटकांचा विकास यावर भर देईल. कर्जमाफी, अनुदान अशा भिकेसारख्या स्वस्त लोकप्रियता मिळवून देणाऱ्या घोषणांना थारा असणार नाही, असे निक्षुन सांगितले होते. याउलट सरकारी तिजोरीवर आपली मतपेढी भरण्याचे राजकारण करण्याची सवय पडलेले पवार टोळीसारखे बडे बडे पुढारी नाक मुरडायला लागले. बाहेरून पवार टोळी व आतून सत्तेत सहभागी असलेले हे असे, यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी; तीही सर्व ७/१२ धारक शेतकऱ्यांना (पगारदार, इन्कम टॅक्स भरणारे व्यावसायिक व राजकारणाच्या धंद्यातून गब्बर झालेल्या राजकीय धेंडासहित) सरसकट देऊन सरकारची तिजोरी रिकामी करा, मूलभूत विकासाचे पुढे पाहू, अशी मागणी करू लागले. या दबावातही विचलित न होता देवेंद्र यांनी तिजोरीचे भान ठेवत मधला मार्ग काढला- तो म्हणजे ७/१२ धारक, पगारदार, व्यावसायिक व राजकीय पुढारी यांना वगळत, निखळ शेतीवर पोट व चरितार्थ असलेल्या शेतकऱ्यांना दीड लाखाची सरसकट कर्जमाफी देण्याचा निर्णय जाहीर केला. यासाठी आधीच्या सरकारांनी खिळखिळी करून ठेवलेल्या अर्थव्यवस्थेतून सुमारे ४० हजार कोटी रुपयांचे नियोजन केले. ही कर्जमाफी काँग्रेस काळातील कर्जमाफीच्या १० पट अधिक होती. तरी या टोळीचे नाक मुरडणे चालू होते. गत १० वर्षांत देशाची व राज्याची खिळखिळी झालेली अर्थव्यवस्था प्रभावी अंमलबजावणीमुळे रेकार्ड ब्रेक मजबूत झाली; सोबतच गत ७०-७५ वर्षांच्या समाजवादी धोरणांमुळे गरीब झालेल्यांसाठी (२०१४ साली १४० लोकसंख्येत ८० कोटी गरीब) कल्याणकारी योजना राबवायला दोन्ही सरकारांना काहीही अडचण राहिली नाही. म्हणूनच देश व राज्य पातळीवरील किसान सन्मान व लाडकी बहीण योजनेंसह इतर सर्व कल्याणकारी योजना निरंतर सुरूच राहतील. 'खटाखट ८५०० रुपये महिनाअखेर बँक खात्यात' अशा शासकीय तिजोरीचे व अर्थव्यवस्थेचे भान न ठेवता, राहुल गांधी टाईप अजागळ योजनेसारखे त्या योजनांचे स्वरूप नसेल, याचे भान या लाडकी बहीण योजनेवर शंका उपस्थित करणाऱ्या पवार टोळीने ठेवावे; उगीच वायफळ बडबड थांबवावी, एवढेच! ▮

**अरविंद नळकांडे**/९८१०९७०६२८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सोयाबीनच्या शेंगा खाल्ल्याने विषबाधा : बारा वर्षीय मुलीचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ५ ऑक्टोंबर**

सिडको एनडीए ४१ या भागातील वास्तव्यास असलेले व मिस्त्री काम करून आपली उपजीविका भागवणारे बबन खानजोडे यांच्या कुटुंबीयांनी सोयाबीनच्या कच्च्या शेंगा आणून उकडून दुसऱ्या दिवशी खाल्ल्याने विषबाधा होऊन बारा वर्षीय मीरा नामदेव खानजोडे हिचा मृत्यू उपचारादरम्यान शासकीय रुग्णालयात मृत्यू झाला.

सिडको येथील रहिवासी व मिस्त्री काम करणारे बबन खानजोडे हे नेहमीप्रमाणे मिस्त्री काम करण्यास सिडको लगत असलेल्या बाबुळगाव तांडा येथे जात होते. तेथील एका सोयाबीनच्या शेतातून हिरव्या सोयाबीनच्या शेंगा आणून त्यांचे कुटुंबीय उकडून दोन दिवसापासून खात होते. परंतु तिसऱ्या दिवशी शेंगा खाल्याने बबन खानजोडे व त्यांच्या लगत असणारा भाऊ नामदेव खानजोडे यांच्या कुटुंबातील सर्वांनी उकडलेल्या शेंगा खाल्ल्याने अचानक मळमळ, उलट्या व संडास सुरू झाली आणि यातच त्यांची प्रकृती खालावली चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली अशा परिस्थितीत त्यांनी ठीक होईल म्हणून कोणत्याही रुग्णालयात गेले नाहीत दोन दिवसाच्या होणाऱ्या संडास उलट्याने त्यांची प्रकृती जास्तच चिंताजनक झाली तेव्हा त्यांचे निकटवर्ती नातेवाईक गिरजाबाई काळे यांनी जबरदस्तीने रुग्णवाहिका बोलावून खानजोडे परिवारातील सर्व सदस्यांना शासकीय रुग्णालयात उपचारास पाठवून दिले व त्यात आठ जणांची प्रकृती समाधानकारक असून त्यांच्यातील बारा वर्षीय मीरा खानजोडे हिला खूपच ताप आल्याने तिचा उपचारा दरम्यान मृत्यु झाल्याची माहिती त्यांचे नातेवाईक नारायण भांडवले यांनी दिली. विषबाधा झालेल्या कुटुंबीयातील खानजोडे परिसरातील नामदेव खानजोडे वय ५० शोभाबाई नामदेव खानजोड, वय वर्षे ४५, सोनी खानजोडे, बबन खानजोडे ५५, सुलाबाई खानजोडे वय वर्षे ४५, जाणू खानजोडे वय ५ वर्षे, अनिल खानजोडे वर्षे३२, सदरील रुग्ण शासकीय रुग्णालयात उपचार घेत असून त्यांची प्रकृती समाधानकारक आसल्याची माहीती मिळाली. पण सोयाबीन शेंगा मधून कुठल्या प्रकारची वीषबाधा झाली, हा नेमका काय प्रकार आहे याचे निदान आत्तापर्यंत डॉक्टरांना कळले नसल्याची माहिती रुग्णांचे नातेवाईक नारायण भांडवले यांनी दिली.



# नांदेडच्या उद्योजकाचा मुंबईत डंका...!

## लक्ष्मीकांत जगलपुरे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ओम अॅडव्हायझरी अँड फायनान्शिअल सर्विसेस च्या माध्यमातून मुंबईसह नाशिक शहरात विस्तारला व्यवसाय..!

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,प्रतिनिधी**

नांदेड शहरात गेल्या दोन दशकापासून फिनान्शियल अॅडव्हायझर म्हणून कार्यरत असलेल्या नामांकित अर्थ सल्लागार व लोन अॅडवायझरी फर्म चे संचालक लक्ष्मीकांत जगलपुरे या ध्येयवेड्या युवकाने आपल्या स्वकर्तृत्वावर मुंबई सारख्या महानगरात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा आपल्या अथक व कठोर परिश्रमातून उमटाविला असून आज रोजी ते फिनान्शियल अॅडव्हायझर आणि लोन अॅडव्हायझर व त्यासोबतच हॉस्पिटल खरेदी विक्रीची कन्सल्टन्सी चालवतात त्यांनी त्यांचा व्यवसाय हा आजघडीला मुंबईसह नाशिक शहरात विस्तारला आहे. सद्यस्थितीत ओम अॅडव्हाएझरी अँन्ड फायन्साशिएल



सर्व्हिसेस प्रा.लि. मार्फत सर्व प्रकारचे लोन, स्टॉक मार्केट गुंतवणूक सल्ला व ट्रेंडींग, म्युच्यूअल फंड ईन्हेस्टमेंटस् यासोबतच सर्व प्रकारचे विमा भरणा या सेवा पुरविण्यात येतात तसेच मुंबईसह नाशिककरांना सुद्धा फिनान्शियल व रिअल ईस्टेट गुंतवणूक क्षेत्रातील सर्वोत्तम सेवा देण्यासाठी आम्ही सदैव तत्पर असू अशी ग्वाही लक्ष्मीकांत जगलपुरे या प्रसंगी दिली.

आपल्या व्यावसायिक वाटचालीत आपल्याला आई-वडील, पत्नी सौ. ज्योती जगलपुरे पारसेवार , मेहुणे डॉ.बळीराम पारसेवार व त्यांचे संपूर्ण कुंटूबिय तसेच साडू किरण गुजलवार कुंटूबिंय यांचे मोठे सहकार्य लाभल्याचे यावेळी त्यांनी आनंदाने सांगितले.

### लोनसह मिळतात हॉस्पिटल कन्सलटन्सी सुविधा

ओम अॅडव्हायझरी अँन्ड फायनान्सियल सर्व्हिसेस च्या वतीने आता लोन सुविधेसह गुंतवणुकीच्या विविध सेवा पुरविण्यात येणार आहेत यात घर-दुकान, ऑफिस खरेदी विक्री किंवा रेंट प्रॉपर्टीज तसेच हॉस्पिटल, मेडीकल,पॅथॉलॉजी लॅब सेटअप खरेदी विक्री किंवा रेंट सेटअप्स् त्याबरोबर हॉस्पिटलसाठी लागणारे डॉक्टर्स , नर्सिंग स्टाफ, तंत्रज्ञ यासह कुशल,अकुशल कामगार पुरवठा आदीं सेवा पुरविण्यात येतात.

## संक्षिप्त वृत्त

### बारड येथे पालक मेळावा उत्साहात साजरा

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील बारड येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारडद्वारा संचलित स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू माध्यमिक शाळा बारड, श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड व शंकरराव देशमुख इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बारड द्वारा दि.५ ऑक्टोबर रोजी पालक



मेळावा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष संजय शंकरराव देशमुख व संचालक मंडळ यांच्या हस्ते माता सरस्वती व शीतला मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आले या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे डॉ. संजय कळमकर प्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते) यांनी या पालक मेळाव्यात विद्यार्थी विकासात पालकांची भूमिका यावर त्यांनी चालू स्थितीवर चुरचुरीत भाष्य करताना पालकांना वास्तवाची जाणीव करून दिली. त्याचबरोबर त्यांनी व्याख्यानात विविध दाखले देत तिरकसपणा ,उपहास, विडंबनाची सहज सुंदर पखरण केली व श्रोत्यांना मंत्रमुग्ध व अंतर्मुख केले. या पालक मेळाव्यात खूप मोठ्या प्रमाणात पालकांची उपस्थिती होती. या कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संजयराव शंकररावजी देशमुख, उपाध्यक्ष रमेशचंद्र महाजन, सचिव रामेश्वर कोरबनवाढ, सहसचिव अशोक गव्हाणे व संचालक मंडळ उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ पंजाबराव शिंदे व आभार प्राध्यापक गोकुळ चव्हाण यांनी मानले .या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक रामकिशन चुबेवर, कॉलेजची प्राचार्य हेमंत इंगळे, व शंकराव देशमुख, इंग्लिश स्कूलचे प्राचार्य सचिन गव्हाणे, त्याचबरोबर शाळा महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतला होता.

### भाजपा अनु. जाती मोर्चा प्रदेश सचिवपदी रामराव भालेराव यांची वर्णी



**अर्धापूर**-भारतीय जनता पार्टी अनुसुचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या नवीन पदाधिकारी निवडीची प्रक्रिया नुकतीच पार पडली. यात अर्धापूर तालुक्यातील भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव चांदोजी भालेराव यांची प्रदेश सचिव पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीचे भोकर विधानसभा मतदार संघातून जोरदार स्वागत केले जात आहे. आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर भारतीय जनता पार्टीच्या संघटन वाढीसाठी कांही नवीन पदाधिका-यांच्या निवडी करून विस्तार करण्यात आला आहे. या निवडीत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशावरून भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव कांबळे यांनी भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते रामराव भालेराव यांची प्रदेश सचिवपदी निवड केली आहे. या निवडीचे नियुक्ती पत्र बुधवारी प्राप्त झाले असून पार्डी (म.) येथील कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या शुभ हस्ते रामराव भालेराव यांना नियुक्ती प्रदान करण्यात आले. यावेळी नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गोविंदराव शिंदे नागेलीकर, बाजार समिती सभापती संजय देशमुख लहानकर, मनपा माजी सभापती किशोर स्वामी, भाजप अनु. जाती जिल्हाध्यक्ष विलास साबळे, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सुधाकर पाटील कदम, माजी सभापती शामराव पाटील टेकाळे, नागोराव भांगे पाटील, अवधुतराव कदम आदी मान्यवर उपस्थित होते. अर्धापूर तालुक्यातील लोणी (बु.) या खेडेगांवात ग्राम पंचायत सदस्य पदापासून राजकारणात सक्रीय असलेले रामराव भालेराव यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत जिल्हा परिषद निवडणूक जिंकुन एक चाणाक्ष आणि अभ्यासू जिल्हा परिषद सदस्य म्हणून सभागृहात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. यातून त्यांची संपूर्ण जिल्हाभरात लोकप्रियता वाढतच गेली. त्यानंतर भाजपचे विधानसभा प्रवक्ते, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा सरचिटणीस, प्रदेश कार्यकारिणी सदस्य अशा विविध पदावर त्यांनी सक्रीय काम केले आहे. त्यांचा हा यशस्वी राजकीय प्रवास लक्षात घेऊन भाजप अनु. जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव कांबळे यांनी रामराव भालेराव यांच्यावर प्रदेश सचिव पदाची जबाबदारी दिली आहे. त्यांच्या या निवडीचे अर्धापूर तालुक्यासह भोकर मतदार संघात जोरदार स्वागत केले जात आहे.

# सोनबर्डी माता मंदिराचा आज कलशारोहण सोहळा

## लेकीबाळींची राहणार उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि.६ ऑक्टोबर-**

अश्विन शुक्ल ४ रोजी सोनभर्डी माता मंदिराचा कलशारोहण सोहळा सोनखेड, हरबळ, मडकी या तिन्ही गावच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात येणार आहे.

सोनभर्डी मातेचे पुरातन,प्राचीन जागृत देवस्थान व नवसाला पावणारी देवी अशी आख्यायिका असलेल्या आणि सोनखेड,हरबळ,मडकी या तिन्ही गावच्या शिवेवर माळावर वसलेल्या. सोनबर्डी मातेच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे त्या मंदिराचा कलशारोहण सोहळा हा सोमवारी ७ ऑक्टोबर रोजी पार पडणार आहे या दिवशी गडावर सकाळी दहा वाजता भाविक भक्तांच्या उपस्थितीत कलशारोहण



सोहळा होईल तर दुपारी ११ ते १ रामायनाचार्य ह.भ.प.बाळू महाराज गिरगावकर यांच्या सुश्राव्य वाणीतून किर्तन सोहळा पार पडेल त्यानंतर व लगेच बारा हजाराच्या वर लोकांचा भव्य महाप्रसाद होईल यावेळी सोनखेड,हरबळ,मडकी या तीनहीगावच्या लेकीबाळींची या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे तरी या कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन या मातेच्या मंदिराचे पुजारी महेंद्र गीर महाराज व सोनखेड,हरबळ,मडकी या तीनही ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे

# संत फुलाजी बाबा देवस्थानला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देईन: आ. केराम

## घोटीफाटा येथे १कोटी रु च्या सांस्कृतिक सभागृह बांधकामाचा भूमिपूजन सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**किनवट,प्रतिनिधी**

जगद्गुरु संत श्रीफुलाजी बाबा यांच्या अध्यात्मिक ज्ञानाचा वारसा ठेवत राहावा यासाठी त्यांचा अनुयायी म्हणून माझ्या काळात फुलाजी बाबांच्या पदस्पर्शाने पावन असलेल्या जागेवर सांस्कृतिक सभागृहाची वास्तू उभी करण्यासाठी एक कोटी रु निधी उपलब्ध करून देऊ शकलो याचे आत्मिक समाधान लाभत आहे असे सांगत तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने भविष्यात आमदार राहिलो तर निश्चितपणे या देवस्थानला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देईल असे आश्वासन आमदार भीमराव केराम यांनी दिले आहे.

घोटी फाटा येथील संत फुलाजी बाबा संस्थान परिसरात आदिवासी उपयोजन अंतर्गत मंजूर झालेल्या एक कोटी रु. च्या सांस्कृतिक सभागृहाच्या कामाचे भूमिपूजन ५ ऑक्टोबर रोजी आमदार भीमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत व पटनापूर येथील सिद्धेश्वर संस्थांचे अध्यक्ष केशवराव फुलाजी बाबा इंगळे यांच्या शुभहस्ते झाले त्यावेळी आयोजित कार्यक्रमात आ. केराम बोलत होते. व्यासपीठावर फुलाजी बाबा संस्थानचे अध्यक्ष आनंदराव सुरोसे, घोटी ग्रामपंचायतच्या सरपंच निर्मलाबाई मेश्राम,भाजप नेते सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, उपसरपंच राजू सुरोसे, सेवानिवृत्त उपअभियंता संतोष टारपे, दत्ता आडे, यांची उपस्थिती होती. पुढे आ. केराम म्हणाले की संत फुलाजी बाबा यांनी घोटीला वास्तव्य केले मात्र मराठवाडा विदर्भ तेलंगणा आंध्र प्रदेश या राज्यात पायी भ्रमण करून त्यांनी अध्यात्मिक ज्ञानाचा प्रचार व प्रसार केला. ध्यानाचे महत्व पटवून दिले.

त्यांच्या सानिध्यात आणि सहवासात आलेल्या प्रत्येक व्यक्तीने फुलाजी बाबांच्या विचाराचा वारसा प्रामाणिक जपला. संतांच्या सानिध्यात मनशांती लाभते, जगण्याची ऊर्जा प्राप्त होते. ही आपली शक्तीपीठे आहेत. बाबाचा अनुयायी या नात्याने मी माझ्या आमदारकीच्या काळात फुलाजी बाबांच्या पदस्पर्शाने पावन असलेल्या जागेवर सांस्कृतिक सभागृहाची भव्य वास्तू उभारण्यासाठी एक कोटी रु निधी उपलब्ध करून देऊ शकलो आणि आज प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली याचे आत्मिक समाधान लाभत आहे. संस्थांनच्या विकासासाठी सढळ हाताने करोडो रुपये किमतीची जागा दान दिल्याबद्दल त्यांनी सुरोसे कुटुंबीयांचे आभार व्यक्त केले असून तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळे भविष्यातही आमदार राहिलो तर निश्चितपणे फुलाजी बाबा देवस्थानाला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळून देईल असे आश्वासन आ. केराम यांनी दिले आहे. यावेळी केशवराव फुलाजी बाबा इंगळे, भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधाकर भोयर यांनी फुलाजी बाबा संस्थान उभारणी व त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

सांस्कृतिक सभागृहासाठी एक कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल घोटी ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच निर्मलाबाई मेश्राम उपसरपंच राजू सुरोसे व ग्रामविकास अधिकारी दिगंबर चव्हाण यांनी आ. केराम यांचा सत्कार केला. कार्यक्रमाची सुरुवात ध्यानसाधनेने तर आरती करून सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारोती भरकड यांनी केले या कार्यक्रमाला संगानियो समितीचे अध्यक्ष मारोती भरकड माजी उपसरपंच बालाजी पावडे,भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार, आशुतोष बेद्रे, मारोती सुंकलवाड, उमाकांत कराळे, निकेतन सुरोसे यांच्यासह घोटी तथव परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरी शहरातील मालमत्ताधारकांनी आपले आक्षेप नोंदवावेत-संजय कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि.६ ऑक्टोबर**

उमरी नगर परिषद प्रशासनाने शहरातील मालमत्ताधारकांना फेरकर मुल्यांकनाच्या नोटीसा बजावलेल्या आहेत. महाराष्ट्र नगर पालिका, नगर परिषदा अधिनियम १९६५ चे कलम ११९ नुसार ह्या नोटीसा दिलेल्या असुन तब्बल १८ ते २० वर्षानंतर शहरातील फेरकर मुल्यांकन होत असल्यामुळे अव्वाचे सव्वा कर लावण्यात आलेलेआहेत जे चूकीचे व जनतेच्या खिशाला न परवडणारे आहेत.

सदरील फेर कर मुल्यांकनाच्या नोटीसीमध्ये वृक्षकर लावलेला आहे परंतु शहरात हरित क्रांती घडवून आणण्याचे दृष्टीने नगर परिषद प्रशासनाने शहरात कुठे व किती झाडे लावलेली आहेत..? तसेच शैक्षणिक कर लावलेला आहे. उमरी नगर परिषदेच्या शाळा नाहीत, ज्या अंगणवाडी, बालवाडी शहरात चालू होत्या त्या देखिल मागील ७ ते ८ वर्षापासुन बंद आहेत. मग हा शैक्षणिक कराचा शहरवासियांचेवर बोजा कशासाठी..?

उमरी शहरात थिक ट्री प्लॅनटेशनसाठी नऊ एक्कर जागा संजय कुलकर्णी यांचे कार्यकाळात खरेदी केलेली असतांना देखिल त्यावर नगर परिषदेचा ताबा नाही त्यामुळे शासनाचे झाडे लावा, झाडे जगवा हे धोरण केवळ कागदावरच आहे.

संजय कुलकर्णी यांचे कार्यकाळात म्हणजे २००४ मध्ये नगर रचना विभागाचे मार्फत शहरातील मालमत्तांचे फेर कर मुल्यांकन होऊन तो कर २००६ पासून शहरात लागू केल्या गेला होता. त्यानंतर २००६ ते २०२१ पर्यंत उमरी नगर परिषदेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची अर्थात गोरठेकर गटाची एकहाती सत्ता होती त्या १५ वर्षाचे कार्यकाळात त्यांनी स्थानिक नागरिकांचा रोष नको म्हणून फेर कर मुल्यांकन होऊ दिले नाही व त्यानंतर नगर परिषदेवर प्रशासकीय राजवट सुरु झाली आणि त्यांनी शासनाचे ध्येय धोरणाचे पालन करित १८ वर्षाचे फेर कर मुल्यांकन एकत्र करुन उमरीवासियांना वेठीस धरलेले आहे जे गैर व कायद्याचे चौकटीत न बसणारे आहे. शहरातील मालमत्ताधारकांनी त्यांना प्राप्त नोटीशीवर हरकती / आक्षेप घेतला पाहिजे जर कोणी आक्षेप घेणार नसेल तर त्यांना तो कर मंजूर आहे असे समजून नगर परिषद प्रशासन त्यांचे कडून तो कर वसून करील त्यासाठी दिनांक ८ आक्टोंबर पर्यंत नागरिकांनी आक्षेप नोंदवावेत असे आवाहन देखिल संजय कुलकर्णी यांनी केले आहे. स्थानिक पातळीवर आगामी नगर परिषद निवडणुक दृष्टीसमोर ठेऊन कांही मंडळी करवाढीचे राजकारण करू पहात आहेत परंतू अशा राजकारणात जनता भरडल्या जाऊ शकते त्याकरिता सर्व पक्षांचे प्रमुख पदाधिकारी यांनी एकत्र येऊन हा विषय शासन दरबारी मांडून स्थानिक नागरिकांना न्याय मिळवून देणे गरजेचे आहेअसा आशावाद उमरी नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी पत्रकारांशी चर्चा करतांना व्यक्त केला आहे. नांदेड जिल्ह्याचे लोकनेते खा. अशोकराव चव्हाण आणि ह्या भागाचे आ. राजेश पवार तसेच शेतकरी नेते मारोतराव कवळेगुरुजींचे मार्गदर्शनाखाली व सहकार्यातुन उमरी शहरातील मालमत्ता कर फेर मुल्यांकनाचा प्रश्न सोडविल्या जाईल असे शेवटी संजय कुलकर्णी यांनी स्पष्ट केले आहे.

# डॉ. मयुरेश जामकर यांना मिळाले आरोग्य क्षेत्रातील दोन पेटंट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.६ ऑक्टोबर**

येथील रहिवासी डॉ. मयुरेश जामकर यांना वैद्यकीय क्षेत्रातील दोन महत्वाची पेटंट मिळाली आहेत. त्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. मयुरेश जामकर हे श्री मधुकराव बापूराव पाटील खतगांवकर महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. दिलीप जामकर-पांपटवार यांचे चिरंजीव आहेत.

वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापर या विषयात डॉ. मयुरेश जामकर यांनी केलेल्या संशोधनाला पेटंट मिळाले आहे. तर न्यूरोलॉजिकल स्थिती असलेल्या रुग्णांसाठी हस्त समन्वय अक्षरे विकसित करणे, या विषयात देखील त्यांनी पेटंट मिळवले आहे. डॉ. मयुरेश जामकर रिसर्च अँड इन्स्टिट्यूशनल इनोव्हेशन कौन्सिलचे विद्यार्थी समन्वयक आहेत. एआय चालित प्रणाली रुग्णांना वैयक्तिकृत आणि




जलद उपचार पर्याय प्रदान करेल, ज्यामुळे त्यांच्या पुनर्वसन प्रक्रियेत अधिक अचूकता आणि कार्यक्षमता येईल आणि परिणामस्वरूप कार्यात्मक परिणाम सुधारतील. याशिवाय, हस्त समन्वय अक्षरांचे उपकरण रुग्णांच्या हस्त कौशल्य आणि समन्वयात सुधारणा करेल, ज्यामुळे त्यांच्या कार्यात्मक परिणामात लक्षणीय सुधारणा होईल आणि दैनंदिन कार्ये स्वतंत्रपणे पार करण्याची क्षमता वाढेल.या यशस्वी कामगिरीबद्दल गार्डन सिटी युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. जी. आर. नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले व त्यांचा सत्कार केला.

# इतवारा पोलीसांनी केले गोवंश जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.६ ऑक्टोंबर**

जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या फ्लश आऊट मोहीमे अंतर्गत इतवारा पोलीसांनी बाफना ते देगलुर नाका मार्गावर एका वाहनातून ८ गोवंश जातीचे जनावरे दि. ०५ ऑक्टोबर रोजी जप्त केली.

बाफना ते देगलूर नाका गेटवर पिक अप वाहनातून गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक होत असल्याची माहीती मिळाल्यावरून इतवारा पोलिसांनी पिक अप वाहन एम. एच २६ एएन ०९३८ व एम एच २६ बिई ४१४३ ची पाहणी केली असता त्यात ३ लाख रूपये किमतीचे गोवंशजातीचे ८ जनावरे आढळून आली. पोलिसांनी या कारवाईत जणावरे व दोन वाहने असा एकुन ९ लाखाचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलिस निरिक्षक रणजीत भोईटे, सपोनि महेश मुळीक, पो. उप निरीक्षक रमेश गायकवाड, विलास पवार, पोहेकॉ शेख वाजीद, कोरनुळे, सय्यद यांच्या पथकाने पार पाडला.

# क्रीडा प्रबोधनीसाठी जलतरणपट्टु रंजीत नरवाडेची निवड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.६ ऑक्टोंबर**

शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत विविध क्रीडा प्रबोधिनी करिता सरळ व कौशल्य चाचणी द्वारे निवासी व अनिवासी खेळाडू करिता निवड चाचणी घेण्यात आली त्यामध्ये जलतरण या खेळ प्रकारात नांदेडचा



जलतरण खेळाडू अजिंक्य रंजीत नरवाडे यांची निवड झालेली असून तो २ ऑक्टोंबर ला पुणे मध्ये प्रशिक्षण साठी दाखल झाला. अजिंक्य चा पूर्ण खर्च महाराष्ट्र शासन उचलेल. मागील चार वर्षापासून शांताराम सगणे मनपा जलतरणीकेवर सदरचा खेळाडू सराव करत होता. त्याला राजेश सोनकांबळे, मयूर आणि संघर्ष यांनी प्रशिक्षण दिले आहे.

अजिंक्य च्या निवडीबद्दल नांदेड जिल्हा जलतरण संघटनेचे अध्यक्ष- आनंद देशमुख, सचिव-रंजीत नरवाडे, उपाध्यक्ष-अनिल बिंगेवार तसेच जलतरणीके चे कर्मचारी व पालक वर्ग यांनी सत्कार करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

# राष्ट्रवादीच्या विधानसभा निहाय इच्छुकाच्या मुलाखती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.६ ऑक्टोबर**


राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार हे स्वतः विधानसभा मतदारसंघावर लक्ष ठेवून आहेत राज्यातील सर्वच विधानसभा निहाय राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी इच्छुकांच्या दि. ०५ ते ०७ तारखे दरम्यान मुलाखती ठेवण्यात आल्या असून दि. ०५ ऑक्टोबर रोजी मराठवाड्यातील पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या नांदेड जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या प्रत्येक मतदारसंघाबाबत शरदचंद्र पवार यांनी इच्छुकासोबत स्वतंत्र वैयक्तिक चर्चा केली.

नांदेड जिल्ह्यातील, किनवट मतदार संघातून माजी आ. प्रदीप नाईक व जयवंत वानोळे, हादगाव मतदार संघातून अभिजीत मुळे, भोकर मतदारसंघातून रामराव चौधरी, नांदेड उत्तर मतदारसंघातून भगवानराव पाटील आलेगावकर, डॉ. सुनील कदम, शेख रऊफ जमीनदार, नांदेड दक्षिण मतदार संघातून प्रा. मजरुद्दीन व गंगाधर कवळे, लोहा कंधार मतदारसंघातून रामचंद्र येईलवाड, नायगाव मतदारसंघातून शिरीष गोरठेकर, व भास्कर भिलवंडे, देगलूर बिलोली मतदारसंघातून सुभाष गायकवाड, दिगंबर गवळे, व्यंकट कांबळे, अनुराधा गंधारे, मुखेड मतदार संघातून शिवाजी नागोराव जाधव यांनी उपस्थित राहून मुलाखती दिल्या. जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर यांनी जिल्ह्यात शरदचंद्र पवार यांना मानणारा मोठ्या प्रमाणावर मतदार आहे, त्यामुळे जिल्ह्यातून तीन ते चार मतदार संघावर राष्ट्रवादीचा दावा करून जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते माजी शिक्षण मंत्री कमलकिशोर कदम, माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील, माजी राज्यमंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर यांच्या सोबत चर्चा करून जास्तीत जास्त मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडून घ्यावी अशी चर्चेमध्ये मागणी केली. याप्रसंगी जिल्ह्याचे सरचिटणीस प्रा.डी.बी जांभरुनकर उपस्थित होते.

# निविदा एकाची, साहीत्य नेले दुसऱ्याने तर परस्पर विक्री केलेल्या साहीत्याचा खरेदीदार तिसराच !

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ५ ऑक्टोंबर**

विष्णुपूरी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील साहीत्य भंगारच्या नावाखाली विक्री करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारात आता नवनवीन माहीती उघड होत असून ज्या गुत्तेदाराला भंगार साहित्य विक्री केले होते. त्याने ती निविदा दुसऱ्याला विकली



तर या संधीचा फायदा घेत तिसऱ्याच कंत्राटरदाराला नियमबाह्यरित्या साहीत्य विक्री केले असल्याची माहिती आहे.

विष्णुपूरी येथील शासकीय वैद्यकीय महाविंद्यालयातील भंगार साहीत्य इंडिया स्क्रॅप या कंपनीला देण्यात आले होते. या कंपनीला जवळपास ५ लाखात हे साहीत्य विक्री करण्यात आले. परंतू इंडिया कंपनीने हे कंत्राट एका माजी नगरसेवकाला विक्री केले. जुलै महिण्यात या कंत्राटदाराने लोखंडी साहित्य, स्टिल साहित्य, प्लास्टीक साहीत्य आदी वर्गीकरण करून साहीत्य नेले. परंतू या संधीचा फायदा घेत येथील काही अधिकारी कर्मचाऱ्यांनी तिसऱ्याच कंत्राटदाराचा शोध घेत परस्परत्या निविदे विनाच भंगार साहित्याची विक्री केली.भंगारच्या नावाखाली नवे साहीत्य देखील विक्री केले. विशेष म्हणजे शासकीय सुट्टीच्या दिवशी दोन ट्रक तर त्यांनतर पून्हा एक ट्रक असे तीन ट्रक पांगरी मार्गे नेण्यात आले. दरम्यान हे साहित्य शहरापासून जवळच असलेल्या धनेगाव येथे नेण्यात आले असून साहित्याची जुळवाजुळव सुरू असल्याची विश्वसनीय माहीती आहे.

# शहरातील रस्ता व नालीबांधकामाचा आ.क्षीरसागरांकडून शुभारंभ





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑक्टोबर**

बीड शहरातील अंबिका चौक-शाहुनगर ते साठे चौक पर्यंतच्या रस्ता व नाली बांधकामाचे आ.संदीप क्षीरसागर यांनी शनिवारी (दि.५) रोजी केला.

राज्य महामार्ग २२२ वरून जोडवाडी-धारवंटा-साक्षाळपिंप्री-पारगाव सिरस-बीड एमआयडीसी ते कुर्ला प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक १८ बीड शहरातून जातो. बीड शहरातील पांगरी रोड-अंबिका चौक-शाहूनगर हा गजबजलेला भाग या मार्गावरच आहे. या रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून खड्डे पडल्याने, पाणी साचत होते तसेच वाहतूकीला अडचण निर्माण होत होती. यावर आ.क्षीरसागर यांनी पाठपुरावा करून या शहरातील महत्त्वाच्या असलेल्या या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. शनिवारी (दि.५) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी विविध मान्यवर तसेच नागरिकांच्या उपस्थितीत येथील रस्ता नाली बांधकामाचा शुभारंभ केला. याप्रसंगी सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, या भागातील अनेक तरूण, जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑक्टोबर**

म.शि.प्र.मंडळ येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जागृती साठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते,या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले हे होते तर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सध्या सी- डॉक हैद्राबाद येथे प्रोजेक्ट इंजिनिअर,सायबर सिक्युरिटी म्हणून कार्यरत असलेले श्री.अतुल बाळासाहेब रसाळ हे व्याख्याते म्हणून लाभले होते.

या वेळी प्राचार्य सर यांनी बोलताना सांगितले की,माहिती तंत्रज्ञानाचा वापर करताना पुरेशा माहिती आभवी चुका होण्याची शक्यता आहे. यातून आपली फसवणूक होऊ शकते. बँकिंगचा वापर करताना आपले पिनकोड सुरक्षित ठेवणे, सोशल मीडियाचा वापर करताना आपले फोटो, तसेच इतर माहिती चोरी होऊन त्याचा गैरवापर होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.



यावेळी श्री.अतुल राऊत यांनी बोलताना सांगितले की,नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून सध्या फसवणूक करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर चालू आहे,सध्या प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्याने सोशल मीडिया सह विविध प, साइट्स आदींचा वापर वाढला आहे. मात्र, वापरकर्त्यांना त्यांची पुरेशी जाण नसल्यास फसवणूक होऊ शकते. एका क्लिकवर जशी हवी ती माहिती मिळवता येऊ शकते, तसेच एका क्लिकवर वापरकर्त्यांचे बँक खाते झीरोवर येऊ शकते.आपला पासवर्ड हा कोणालाही शेयर करू नये किंवा कुठल्याही बनावट मेसेज वर विश्वास ठेऊ नये किंवा बनावट वेबसाईट वर विश्वास ठेऊन आपली माहिती देऊ नये वेबसाईट बनावट आहे ओळखताना वेबसाईटचे नाव काहीतरी वेगळे असते. वेबसाईट https नसते. महागड्या वस्तू खूप कमी किमतीत दाखवले जातात.

अशा बनावट संकेतस्थळावर युसर नेम, पासवर्ड,नाव, पत्ता,माहिती भरली गेली तर फसवणूक होऊ शकते या पासुन सावध राहावे इत्यादी विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# छत्रपती साखर कारखान्याचा अकरावा गळीत हंगामाचा बॉयलर अगनी प्रदिपन सोहळा




**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ ऑक्टोबर**

दि.०७ माजलगाव तालुक्यातील सावरगाव येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा अकरावा गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा रविवार रोजी सकाळी १० वाजता कारखान्याचे चेअरमन बाजीराव जगताप यांच्या अध्यक्षतेखाली व ह.भ.प. हंसराज मिसाळ महाराज आणि कारखान्याचे संचालक सुदामराव आगे व त्यांच्या पत्नी सुनंदाताई सुदामराव आगे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. बॉयलर अग्निप्रदीपण सोहळ्यास कारखान्याचे संचालक राहुल जगताप, दिलीप घुबडे,पांडुरंग शिंदे,भाऊसाहेब गोंडे, विलासराव बडे, रावसाहेब गायकवाड, पंडित काळे,दत्तात्रय वाळससकर, काशिनाथ कोरडे, मल्हारी उजगरे,बळीराम सवणे, मीनाक्षी थावरे, सविता शेंडगे, दिलीप तौर,गोपाळराव डाके, रमेश मोरे,डॉ.काठवडे, हनुमंत बादाडे,शरद यादव,अँड. जयराम सजगणे, कार्यकारी संचालक महेश सगरे, सचिव चंद्रकुमार शेंडगे ,शेतकी अधिकारी देशमुख, कारखाने सर्व खाते प्रमुख विभाग प्रमुख कर्मचारी ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूक ठेकेदार व नागरिक उपस्थित होते.

# सायबर इन्फोटेक येथे स्वा.सावरकर कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑक्टोबर**

या वेळी सायबर इन्फोटेक चे बीड जिल्हा समन्वयक श्री विठ्ठल पांचाळ यांनी आजच्या युगात कॉम्प्युटरची असलेले महत्त्व आणि विद्यार्थ्यांचा कॉम्प्युटरकडील कल, असलेल्या विविध प्रकारच्या संधी आहेत,

कॉम्प्युटर क्षेत्रामध्ये आज मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारच्या संधी आहेत या संधीचा उपयोग आपण सर्वांनी घेतला पाहिजे कॉम्प्युटरचे सर्व ज्ञान विद्यार्थ्याला आले पाहिजे. असे आव्हान केले

याप्रसंगी Future Vedh (Career Inclination Test) - २०२४-२५, फ्री टेस्ट मध्ये विद्यार्थ्यांचे रेजिस्टेंशन केले. तसेच Cyber Security बद्दल माहिती सांगण्यात आली व विद्यार्थ्यांकडून प्रॅक्टिस करून घेण्यात आली.

यावेळी चघउङ एम के सी ल चे ज़िल्हा समन्वयक विठ्ठल पांचाळ यांनी मार्गदर्शन केले यावेळी सावरकर महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्रा. दीपक देशमुख प्रा. संजय पत्की प्रा. विठ्ठल वाघीरकर प्रा.मोहन मंकले प्रा. रत्नमाला सोनवणे आणि असंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते यावेळी महाविद्यालयाच्या वतीने प्रा. संजय पत्की यांनी आभार व्यक्त केले.



# दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत रोहित कुलकर्णी प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑक्टोबर**

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर प्राथमिक विद्यालयातील उपक्रमशील सहशिक्षक श्री रोहित रमेश कुलकर्णी यांना गट पहिली व दुसरी भाषा विषयासाठी दर्जेदार व्हिडिओ निर्मितीबद्दल बीड तालुक्यातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. त्याबद्दल विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी सर व सर्व शिक्षकवृंद यांच्या हस्ते गौरविण्यात आले.त्यांच्या या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉक्टर हेमंत वैद्य,अध्यक्ष डॉक्टर सुरेंद्र आलूरकर,प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे,केंद्रीय कार्यकारिणी सदस्स तथा शिक्षक प्रतिनिधी उमेश जगताप ,स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉक्टर पी के कुलकर्णी ,स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह डॉक्टर अविनाश देशपांडे,स्थानिक शालेय समिती अध्यक्ष एस एन कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.



सावरकर प्राथमिक विद्यालयात विभाग १ ते ४ मध्ये आनंददायी शनिवारनिमित्ताने वर्ग ३ री च्या विद्यार्थ्यांचे सामूहिक वाचन घेण्यात आले.विद्यार्थांना गोष्टीची पुस्तके वाचण्यास ग्रंथालयातून देण्यात आली.या उपक्रमास मुख्याध्यापक जोशी सर ,विभाग प्रमूख श्री आचवले तसेच वर्ग ३ री चे सर्व शिक्षक उपस्थित होते .हा उपक्रम ग्रंथालय विभाग प्रमूख श्रीमती माने ताई यांनी आयोजित केला होता.

# बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार; अनिलदादा मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे अत्यंत विश्वासू-अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑक्टोबर**

शिवसेना नेते संसदरत्न खासदार मां. डॉ श्रीकांत शिंदे साहेबांचा बीड विधानसभा संवाद दौरा विजयाकडे घेऊन जाणारा ठरला पाहिजे. बीड मतदार संघ शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे आणि सध्या सर्वात जास्त अनुकूल परिस्थिती आहे त्यामुळे बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार यात शंका नाही.जिल्हाप्रमुखामध्ये अनिलदादा जगताप मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या अत्यंत जवळचे आणि विश्वासू आहेत. दादांच्या कार्य पद्धतीवर शिंदे साहेबांचा विश्वास आहे. दादांना शिंदे साहेबांकडे विशेष आदर सन्मान आहे. आपल्याकडे दोन माहीने राहिलेत. येणारे दोन माहीने पक्षाला द्या. रात्रीचा दिवस दिवसाची रात्र करा. बीड मतदार संघावर आपली चांगली पकड आहे, आपण बाळासाहेबांचे शिवसैनिक आहोत त्यामुळे येणारी निवडणुका आपल्याला मोठ्या ताकदीने लढावी लागणार आहे असे प्रतिपादन शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांनी केले.

संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांचा येत्या ८ ऑक्टोबर रोजी बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा संपन्न होणार आहे. याच अनुषंगाने

## शिवसेनेची बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा पूर्व नियोजन बैठक





काल दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी दु. ३.०० वाजता दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मेळाव्याच्या पूर्व तयारीसाठी बैठक पडली.

या बैठकीमध्ये अर्जुनजी खोतकर साहेब यांनी खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब बीड मतदार संघात पहिल्यांदा येत असून त्यांच्या संवाद दौरा मेळाव्या बाबत महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, येणारा काळ शिवसेनेचा आणि शिवसैनिकांच्या भगव्याचा असून महाराष्ट्रावर भगवा फडकविण्यासाठी एकजूट होऊन ताकदीने विधानसभा निवडणूक लढवायची असल्याचे सांगितले. बीडची जागा ही शिवसेनेची आहे व ती शिवसेनेलाच सुटेल यात शंका नाही असे त्यांनी सांगितले.

यादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी देखील उपस्थितांना संबोधित केले व दोघांनी मिळून बीड मतदार संघात शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणी समस्या अर्जुनराव खोतकर यांच्यासमोर मांडल्या. या बैठकीसाठी बीड जिल्हा शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनेचे आजी- माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालरंगभूमी परिषद बीड शाखेच्या वतीने दिव्यांग महोत्सव यहॉ के हम है सिकंदर मोठ्या उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ ऑक्टोबर**

दिव्यांग मुलांच्या चेहर्यावरील आनंद पाहण्यात वेगळेच समाधान असते.ही मुले खूपच निरागस असून यांच्यासाठी बालरंगभूमी परिषद भविष्यात मोठ्या प्रमाणात काम करेल. असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषद,मुंबई परिषदेच्या अध्यक्ष अॅड. निलम शिर्के सामंत यांनी यहाँ के हम है सिकंदर दिव्यांग महोत्सव बालरंगभूमी परिषद, शाखा बीड येथे जिल्हास्तरीय दिव्यांग महोत्सवाचे उदघाटन प्रसंगी केले.

बालरंगभूमी परिषद आपल्या व्याप्तीनुसार दिव्यांग मुलांच्या सांस्कृतिक,सामाजिक व शैक्षणिक उन्नतीसाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. बालरंगभूमी परिषद,मुंबईच्या वतीने दिव्यांग मुलांच्या सर्वांगिण विकासाच्या दृटीने कार्य करत असताना त्यांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या सुप्त कला गुणांना प्रोत्साहन देऊन त्यांना सक्षम प्रवाहात आणण्यासाठी यहाँ के हम है सिकंदर हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

बालरंगभूमी परिषद,मुंबईच्या अध्यक्ष अॅड. निलीम शिर्के सामंत म्हणाल्या की, राज्यात दिव्यांग महोत्सवाची सुरूवात सर्व प्रथम बीड शाखेच्या अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून होत आहे.महोत्सवाचे हे पहिले वर्ष असून पुढील वर्षी यापेक्षा आणखी उत्तम नियोजन केले जाईल यासाठी दिव्यांग शिक्षकांनी पुढे येऊन सुचना कराव्यात.पालकांनी आपल्या मुलांमध्ये कमतरता असल्याची तमा न बाळगता मुलां बरोबर प्रेमाने वागावे त्यांच्या भाषेत समजेल असे बोलावे परमेश्वरानंतर जर कोणाचा क्रमांक लागतो तर तो या दिव्यांग मुलांचा लागतो. ही कारण ही खूपच निरागस असतात.मी माझी बावीस वर्षापासून या दिव्यांग मुलांसाठी काम करत आहे.

# आ.पंकजा मुंडे यांच्या हस्ते पुण्यात रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्राच्या 'धागा' प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**पुणे दि.६ ऑक्टोबर**

महिला कुटुंब सावरण्यात हातभार लावते. महिलेने केवळ घर सांभाळावे आणि पुरुषांनी बाहेर कमवावे, अशी परिस्थिती आता राहिलेली नाही. तिच्या अंगी कलाकुसर, सचोटी, प्रामाणिकता, जिद्द, नीटनेटकेपणा असतो. एखाद्या गोष्टीसाठी आपण महिलांना प्रोत्साहन देतो; शक्ती देतो. मात्र, त्यांना शक्तीसोबत सन्मानही मिळाला, तर त्या



विविध क्षेत्रात यशाची शिखरे गाठतात, असे प्रतिपादन भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजा मुंडे यांनी केले.

रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्रातर्फे आयोजित 'धागा' या स्वदेशी मेळ्याचे उद्घाटन पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते काल झाले. प्रसंगी संयोजक व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, 'द शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडियाचे' उपाध्यक्ष चारुदत्त देशपांडे, 'ब्रिहन्स नॅचरल प्रॉडक्ट'च्या संचालक शीतल आगाशे, 'एमएसएमई'चे सहसंचालक मिलिंद बारापात्रे, उपसंचालक अभय दफ्तरदार, माजी नगरसेवक दिलीप वेडेपाटील, जयंत भावे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तुळजापूर येथे श्री तुळजाभवानी नवरात्र महोत्सवानिमित्त आरोग्य विभाग भाविकांसाठी सज्ज

**२४ तास भाविकांना मिळत आहे आरोग्य सेवा... १४ हजार ९० भाविकांनी घेतला आरोग्य सुविधेचा लाभ... * आरोग्य सेवेतील १ हजार मनुष्यबळ * ६ आयसीयू सेंटर कार्यरत * १०२ च्या १२ आणि १०८ च्या १३ रुग्णवाहिका कार्यरत * १६ साथरोग प्रतिबंधात्मक पथके * १० दुचाकी फिरत्या रुग्णवाहिका * ५९०२ पाण्याच्या नमुन्याची तपासणी**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑक्टोबर -**

श्री शारदीय नवरात्र महोत्सव २०२४ तुळजापूर येथे ३ ऑक्टोबरपासून सुरु झाला आहे.राज्यातून व परराज्यातून भाविक भाविक व पायी यात्रेकरू चालत तुळजापूर शहराकडे लातूर रोड,धाराशिव रोड,सोलापूर रोड,नळदुर्ग रोड,लोहारा रोड आणि कर्नाटक-उमरगा रोड या मार्गाने दाखल होत आहेत.६ ऑक्टोबरपर्यंत १४ हजार ९० भाविकांनी आरोग्य सुविधांचा लाभ घेतला आहे.

भाविकांना आरोग्य सुविधा देण्यासाठी आरोग्य विभागामार्फत तज्ञ डॉक्टर्स व आरोग्य कर्मचारी असे एकूण १ हजार मनुष्यबळ आपली सेवा देत आहेत. २२ प्रथमोपचार केंद्र सुरू करण्यात आले असून तुळजापूरकडे येणाऱ्या प्रत्येक मार्गावर २४ तास १९ आरोग्य पथके कार्यरत आहेत. प्रथमोपचार केंद्रावर १ समुदाय आरोग्य अधिकारी व १ आरोग्य कर्मचारी पुरेशा औषधी साठ्यासह आरोग्य सेवा देत आहे.

१६ साथरोग प्रतिबंधात्मक पथके यात्रा मार्गावर १० (ग्रामीण) साथरोग प्रतिबंधात्मक पथके व शहरी भागात ०६ पथके नियुक्त.प्रत्येक पथकामध्ये ०१ आरोग्य सहाय्यक व ०१ आरोग्य सेवक व परिचर यांचा समावेश.पथकाद्वारे यात्रा मार्गावरील व शहरातील सर्व पाणीस्त्रोत व पाणीसाठे,हॉटेल,धाबे,लॉज इत्यादी. ठिकाणचे पाणी तपासणी व पाण्याचे



शुद्धीकरण करण्यात येत आहे. १० फिरते आरोग्य पथके बाईक अँब्युलन्स माध्यमातून कार्यरत आहे.तुळजापूर शहराकडे येणाऱ्या एकुण ६ मार्गावर ३ शिफ्टमध्ये दुचाकी रुग्णवाहिका कार्यरत आहेत.१३ रुग्णवाहिका यात्रा मार्गावर २४ तास सेवेसाठी तत्पर आहे.प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील १०२ च्या १२ व तुळजापूर शहरात १०८ च्या १३ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. आरोग्य शिबीरात ६ आय.सी.यु.सेंटर सुरू केले आहे.तुळजापूर शहरामध्ये यात्रा कालवधीत ५ खाटांचे ६ आय.सी.यु. बेड हॉस्पिटल स्पेशिलीस्ट डॉक्टर्स,सर्व औषधी व अत्याधुनिक उपकरणासह २४ तास सेवा देत आहेत.१५ आरोग्यदुत पथके तुळजापूर शहरामध्ये प्रथमोपचार किटसह एकूण ३० आरोग्य सेवक आरोग्य दूत म्हणून कार्यरत आहेत. शहरात व शहराच्या १ किमी अंतरामध्ये आरोग्यदुत प्रथमोपचार कीटसह पायी फिरती करून आरोग्य सेवा व आरोग्यविषयी जनजागृती करण्यात येत आहे.

महाआरोग्य शिबीर सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रा.डॉ तानाजीराव सावंत यांच्या संकल्पनेतून व सार्वजनिक आरोग्य विभाग धाराशिव यांचे वतीने तुळजापूर येथे ३ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत नळदुर्ग रोड तुळजापूर,छत्रपती संभाजी महाराज उद्यान तुळजापूर,धाराशिव रोड तुळजापूर या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये तुळजापूर येथे येणाऱ्या भाविकांना तसेच ग्रामीण भागातील जनतेला मोफत आरोग्य तपासणी व मोफत उपचार उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामध्ये आरोग्य तपासणी,हाडांची तपासणी,डोळ्यांची तपासणी, शल्यचिकित्सा विभाग,रक्तक्षय तपासणी, तपासणी,चष्म्यांचे वितरण,रक्तगट तपासणी,आभा कार्ड काढणे इत्यादी. सुविधा देण्यात येत आहे.

६ ऑक्टोबरपर्यंत आय.सी.यु.सेंटर येथे ४५२,प्रथमोपचार केंद्रे येथे ९७०७,आरोग्य शिबिरामध्ये २२२०,आरोग्यदूतांच्या माध्यमातून ४६१,दुचाकी रुग्णवाहिकेच्या माध्यमातून ५५२,बीव्हीजी १०८ रुग्णवाहिकेच्या माध्यमातून ४५८ अशा एकूण १४ हजार ९० भाविकांना आरोग्य सुविधा देण्यात आली आहे.

६ ऑक्टोबरपर्यंत एकूण ५९०२ पाणी नमुने तपासणी करून ३०६० पाणी स्त्रोत शुद्धीकरण करण्यात आले आहे.यात्रा कालावधीत सर्व भाविकांनी आरोग्य शिबीर व आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा.असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.श्री मैनाक घोष,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास व प्रभारी जिल्हा शल्यचिकीस्तक डॉ नागनाथ धर्माधिकारी यांनी भाविकांना केले आहे.

---

### महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना

## मयत लाभार्थ्यांच्या वारसाची माहिती ७ ऑक्टोबरपर्यंत पोर्टलवर अपलोड करावी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑक्टोबर -**

जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांना महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत अल्पमुदत पीककर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयापर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याच्या योजनेची अंमलबजावणी सुरु आहे.

या योजनेअंतर्गत प्रसिध्द झालेल्या लाभार्थ्यांच्या यादीतील काही शेतकरी मयत झाल्यामुळे त्यांना योजनेचा लाभ मिळालेला नाही. अशा मयत लाभार्थ्यांच्या वारसांना लाभ देण्यासाठी शासनाने निर्णय घेतला आहे. वारसाची माहिती अपलोड करण्यासाठी योजनेचे पोर्टल ७ ऑक्टोंबर-२०२४ पर्यंत चालु करण्यात आले आहे.

तरी योजनेअंतर्गत मयत लाभार्थ्यांच्या वारसांनी त्यांचे बैंक शाखेस संपर्क करुन आपली माहिती योजनेच्या पोर्टलवर अपलोड करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांनी केले आहे.

---

## ३० एप्रिलचे परिपत्रक रद्द करुन जिल्ह्यातील ५ लाख १५ हजार शेतकऱ्यांना ९०० कोटी रुपये पीक विमा वितरित करावा

### सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑक्टोबर -**

३० एप्रिल २४ रोजी केंद्र शासनाने एक जुलमी परिपत्रक काढून महाराष्ट्रातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना पिक विम्या पासून वंचित ठेवण्याचे काम केले आहे. त्यामुळे ३० एप्रिल रोजीचे जाचक परिपत्रक तात्काळ रद्द करून धाराशिव जिल्ह्यातील ५ लाख १५ हजार शेतकऱ्यांना पीक विम्याची ९०० कोटी रुपये तात्काळ वितरित



करावे अन्यथा शासनाला आणि पीक विमा कंपनीला शेतकऱ्यांच्या रोषाचा सामना करावा लागेल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते व पीक विमा याचिकाकर्ते अनिल जगताप यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. धाराशिव जिल्ह्यात गेल्या वर्षी एकूण ७ लाख ५७ हजार ८५३ अर्जदार शेतकऱ्यांनी पिक विमा भरला होता. त्या पोटी ६१२ कोटी ४५ लाख रुपये पिक विमा कंपनीला देणे रक्कम होती. त्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची संख्या ५ लाख ६० हजार ४६८ इतकी होती. गेल्या वर्षी धाराशिव जिल्ह्यात २१ दिवसाचा पावसाचा खंड पडल्याने २५ टक्के अग्रीम देण्यात आला होता. ती रक्कम २५७ कोटी असून, ५ लाख ५५ हजार शेतकऱ्यांना अग्रीम दिला गेला.

विमा कंपनी आणखी ९०० कोटी रुपये देणे लागते हे पुराव्यानिशी सिद्ध करायला तयार गेल्या वर्षीच्या पीक नुकसान भरपाई पोटी पीक विमा कंपनीकडून २६ जून २०२३ च्या परिपत्रकाप्रमाणे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ९०० कोटी रुपये मिळतील हे पुराव्यानिशी कुठल्याही तज्ञ व्यक्तीसमोर दाखवायला तयार असल्याचे देखील अनिल जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. २१ ऑगस्ट २०२४ रोजी केंद्रीय कृषिमंत्र्यांनी परळी येथील कृषी प्रदर्शनात दिल्लीत गेल्यानंतर हे परिपत्रक रद्द करू असे सांगितले. मात्र दीड महिन्याचा कालावधी उलटून गेला तरी अद्यापही परिपत्रक रद्द झाले नाही. सत्ताधारी आमदार केवळ पत्र दिले आहे, फोन आला आहे एवढीच आश्वासने देऊन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करत आहेत. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी परिपत्रक रद्द करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

त्यानंतर जिल्ह्यात पावसाने नुकसान झाल्याने १ लाख ९३ हजार शेतकऱ्यांनी पूर्व सूचना दिल्या. त्यापैकी ३७ हजार शेतकऱ्यांना ३९ कोटी रुपयांचे वाटप झाले. याचा अर्थ अद्यापही ५ लाख १५ हजार शेतकरी सरसकट पिक विमा मिळण्यापासून वंचित आहेत असे जगताप यांनी निवेदनात म्हटले आहे.

---

## पालकमंत्री प्रा.सावंत यांच्या मध्यस्थीने महिलांचे उपोषण सुटले

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ ऑक्टोबर -**

मतदारसंघातील ३६ हजार महिलांना रोजगार दिला आहे. लाडके मुख्यमंत्री यांनी ताईसाठी एवढे करुनही तुमच्यासारख्या महिलांनी उपोषणाला बसू नये, सरकारवर विश्वास ठेवा तुम्हाला न्याय मिळेल, असे आश्वासन उपोषणकर्त्या महिला बचत गटांच्या महिलांना पालक तथा आरोग्य मंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत यांनी आश्वासन दिल्यानंतर त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर मागील दोन दिवसापासुन उपोषणाला बसलेल्या महिलांनी पाणी पिवुन उपोषण सोडले.

यावेळी उपोषणकर्त्यां महिलांनी आमचा मुख्यमंत्री व तुमच्यावर विश्वास असल्यानेच आम्ही उपोषण मागे घेत असल्याचे यावेळी म्हणाल्या. पालकमंत्री



तथा आरोग्य मंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत जावुन आपली मागणी मुख्यमंत्री आपल्याला न्याय मिळवुन दिला जाईल असे आश्वासन दिल्याने महिला बचत गटांचा कार्यकत्यांनी शुक्रवार सांयकाळी उपोषण स्थगित केले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे उपस्थित होते. यावेळी उपोषणकर्त्या महिला कल्पना गायकवाड, माया चव्हाण, किरण निबांळकर, मिना सोमाजी, नयना महाजन, रुपाली घाडगे, जयश्री महाजन, कोमल महाजन यांनी पाणी घेऊन उपोषण सोडले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल खोचरे उपस्थित होते.

---

## शिक्षण विभाग बीट बावी यांचेकडून खेळाडूंचा गुणगौरव संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ ऑक्टोबर -**

विद्यानगर बावी येथील वसंत प्राथमिक जवाहर माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी शालेय पावसाळी क्रीडा स्पर्धेत वैयक्तिक व सांघिक स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. कबड्डी या स्पर्धेत आश्रम शाळेचे १४, १७, १९ वयोगट मुलांचे संघ तालुक्यात प्रथम आले होते, जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होऊन १४ वयोगट मुलांचा व १९ वयोगट मुलांचा संघ जिल्ह्यात प्रथम आले. जिल्ह्याचा नेतृत्व करताना १४ वयोगट लातूर विभागातून प्रथम आला तर १९ वयोगटाचा संघ तृतीय आले ,१४ वयोगट कबड्डीचा संघ दिनांक १३ ऑक्टोबर रोजी बालेवाडी पुणे येथे राज्यस्तरीय स्पर्धा खेळणार आहे. त्याचबरोबर शालेय रब्बी १९ वर्षे मुलांचा संघ जिल्ह्यात द्वितीय आला



तर शालेय बेसबॉल १९ वयोगट मुलींचा दुसरा १७,वयोगट मुलींचा तिसरा आला तसेच १९ वयोगट मुलींचा सॉफ्टबॉल मध्ये तृतीय आला. त्याचबरोबर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था धाराशिव व शिक्षण विभाग आयोजित कला महोत्सवांमध्ये शाळेने बंजारा समुहनृत्य सादर करून जिल्ह्यामध्ये द्वितीय आला.

सर्व विजयी खेळाडूंचे पुष्पगुच्छ देऊन शिक्षण विभाग बीट बावीचे शिक्षण विस्तार अधिकारी चिलवंते सी.एन.केंद्रीय मुख्याध्यापक बावीचे शीर्षीकर आश्रम शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य दयानंद मनोहर राठोड संस्थेचे प्रशासकीय अधिकारी जगताप बी.यु.यांनी विजयी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक प्रा.राठोड व्ही.टी. जगताप औदुंबर जाधव एन.बी. यांचा शालेय प्रांगणात पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

---

## विद्याभवन हायस्कूलच्या विद्यार्थ्यीनीनी बनवल्या टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू

**कळंब, दि.६ ऑक्टोबर -**

विद्याभवन हायस्कूल कळंब या प्रशालेत स्वच्छ भारत मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो.

महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त प्रशालेतील इ ८ अ च्या विद्यार्थ्यांसाठी टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे हा उपक्रम घेण्यात आला हा उपक्रम मराठी विषयाचे नवोपक्रमशिल शिक्षक सोपान पवार यांनी कार्यानुभव विषय अंतर्गत हा उपक्रम राबविला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात कौशल्याधिष्टीत शिक्षणाला अत्यंत महत्वाचे देण्यात आले आहे. या उपक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांनी श्रावणी दिवटे, ऋतुजा आडसुळ, नबा शेख, स्वानंदी कुलकर्णी, रिया आडणे, सिमरन शेख,श्वेता मुळे, अनुष्का लोणकर महेक पठाण सायली शिंपले या विद्यार्थ्यांनीनी तयार केलेल्या वस्तू लेखनही ठेवण्याचा डब्बा, फुलदाणी, मणक्यापासून मोर ,बॉटल पासून झाड,,पिस्ता डिझाईन, आईस्क्रीमच्या घर अशा विविध सुंदर आकर्षक वस्तू तयार केल्या.

---

## श्री बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज यांच्या अनुष्ठान; भाविकांची दर्शनासाठी गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.६ ऑक्टोबर -**

अन्न-पाणी तसेच सर्व नैसर्गिक विधिंचा त्याग करून आपल्या छातीवर घटस्थापना करून अनुष्ठान सुरु करणारे महान तपस्वी श्री बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज यांच्या अनुष्ठानाचा दि.६ ऑक्टोबर रोजी चवथ्या दिवशीही महाराजांची प्रकृती चांगली आहे.

अनुष्ठान ठिकाणी नागरीकांनी मोठी गर्दी केली असुन सायंकाळी याठिकाणी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

या कार्यकमाचे आयोजन नळदुर्ग शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

नळदुर्ग येथे नवरात्र महोत्सवानिमित्त नवरात्रीच्या पहिल्या दिवसांपासुन ते विजयादशमीपर्यंत श्री तुळजाभवानी देवीसमोर महान तपस्वी श्री बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज हे अन्न-पाणी तसेच सर्व नैसर्गिक विधिंचा त्याग करून आपल्या छातीवर घटस्थापना करून तब्बल दहा दिवस लोक कल्याणासाठी तपस्या करीत आहेत. दि. ६ ऑक्टोबर रोजी अनुष्ठानाचा चौथा दिवस होता.

अनुष्ठान सुरु होऊन चार दिवस झाले मात्र आजही महाराजांची प्रकृती चांगली आहे. अशाप्रकारचे कठीण कार्य दैवी शक्ती प्राप्त असल्याशिवाय होऊ शकत नाही त्यामुळे महाराजांचे हे कार्य महान आणि कल्याणकारी आहे.

गेल्या चार दिवसात या अनुष्ठान ठिकाणी शेकडो भाविकांनी भेट देऊन महाराजांचे तसेच आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले.

यावेळी सिद्ध केलेल्या रुद्राक्षांचे भाविकांना वाटप करण्यात येत आहे. हे अनुष्ठान दि. १२ ऑक्टोबर पर्यंत म्हणजे विजयादशमी पर्यंत चालणार आहे.

या अनुष्ठान कार्यक्रमाचे आयोजन नळदुर्ग शहर सकल हिंदु समाजाने केले आहे. याठिकाणी येणाऱ्या भाविकांना दररोज याठिकाणी महाप्रसाद दिला जात आहे.

सकल हिंदु समाजाच्या कार्यकर्त्यांनी अतिशय चांगले नियोजन करून याठिकाणी येणाऱ्या भाविकांना कुठलाच त्रास होऊ नये याची दक्षता घेतली आहे.

गेल्या चार दिवसात पोलिस प्राधिकरण समितीचे सदस्य उमाकांत मिटकर, नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे, माजी नगरसेवक संजय बताले, पत्रकार विलास येडगे, सामाजिक कार्यकर्ते अमर भाळे यांच्या हस्ते याठिकाणी महाआरती करण्यात आली आहे.

त्याचबरोबर या अनुष्ठान कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

---

## दळवेवाडी रस्त्याचे काम कासव गतीने सुरू; संबंधित विभागाचे रस्त्याकडे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.६ ऑक्टोबर -**

देशात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून रस्त्याचे मोठ्या प्रमाणात जाळे विणले आहे. यामुळे दळणवळणाला मोठी चालना मिळाली असून याचा अर्थव्यवस्थेला ही चांगला फायदा झाला असल्याचे बोलले जात आहे. मात्र गाव खेड्यात



स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे याचा अभाव असल्याचे दिसून येत आहे.

वाशी तालुक्यातील दसमेगाव ते दळवेवाडी रस्ता मागील बरेच वर्ष झाली प्रचंड खराब झाला होता. शासनाचे ही बाब लक्षात घेऊन रस्त्याचे काम सुरू केले आहे. परंतु ठेकेदाराकडून कासव गतीने सुरू असल्याने गावकऱ्यांना तसेच वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ठेकेदाराने रस्त्याच्या दुतर्फा बाजूला बरेच दिवस झाले खडीचे ढिग टाकले आहेत परंतु आद्यप कामाला गतीने सुरुवात केली नसल्याने गावकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवास करणे जिकिरीचे बनले आहे. यामधून नागरिकांना जात असताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. रस्त्याचे डांबरीकरण कधी पूर्ण होणार असा प्रश्न यानिमित्ताने नागरिकांनी उपस्थित केला आहे. राज्यमार्गाला आणि वाशी तालुक्यातील अनेक गावांना जोडणारा हा रहदारीचा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते परंतु मागील बरीच वर्षे झाली हा रस्ता प्रचंड खराब झाल्यामुळे दळण वळणावर ही याचा परिणाम झालेला दिसून येत आहे. तसेच सातत्याने अपघाताचे प्रकार ही घडत आहेत.

तरी देखील संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. शासन, प्रशासनाने लक्ष देऊन रस्त्याचे डांबरीकरण लवकरात लवकर करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

---

### शेतकऱ्यांना तातडीने मदत करा

**लोहारा, दि.६ ऑक्टोबर -**

तालुक्यात अतिवृष्टी व सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीचे शेतकऱ्यांना तातडीने मदत करुन अनुदान देऊन, सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यात यावे, अशा मागणीचे निवेदन शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने एसडीओ गणेश पवार यांना दिले आहे.

निवेदनावर जिल्हा संघटक ॲड.दिपक जवळगे, तालुका प्रमुख अमोल बिराजदार, शहर प्रमुख सलीम शेख, महेबुब गवंडी, विलास साळुके, राम मिटकरी, सचिन रसाळ, सोमनाथ पाटील, प्रभाकर रसाळ, पंडित रसाळ, किसन रसाळ, बलभीम रसाळ, विश्वनाथ सुतार, जाधव, श्रीकांत वडजे, कुलदीप बडुरे, केशव सरवदे, प्रा.पांडुरंग पोळे, बळीराम गोरे, सविता माडोळे, शालीनी चव्हाण यांच्या सह्या आहेत.

---

## मानकेश्वर येथे खेळ पैठणीचा सन्मान नारी शक्तीचा कार्यक्रमास महिलांचा उदंड प्रतिसाद





**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.६ ऑक्टोबर -**

भुम तालुक्यातील माणकेश्वर येथे परिसरातील महिलांना चुल आणि मुल या पलीकडे जाऊन एक आगळे वेगळे व्यासपिठ मिळावे या उद्देशाने राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून धनंजय सावंत मित्र परिवार परंडा, भुम, वाशी यांच्या वतीने दि.५ शनीवार रोजी खास लाडक्या बहिणींसाठी सिनेअभिनेता क्रांतीनाना मळेगावकर व बालगायिका टिव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर प्रस्तुत खेळ पैठणीचा सन्मान नारी शक्तीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमीचे पुजन करूण करण्यात आले. या कार्यक्रमास महिलांचा उत्सपुर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातुन वेगवेगळे मनोरंजनात्मक खेळ महिलांसाठी घेण्यात आले.

यावेळी संगिताच्या तालावर महीला मंत्रमुग्ध झाल्या होत्या. त्याचबरोबर यावेळी महीला गाण्याच्या तालावर चागल्याच थिरकल्या. मानकेश्वर येथे महीलांसाठी खेळ पैठणीचा सन्मान नारी शक्तीचा आशा प्रकारच्या कार्यक्रमाचे प्रथमच आयोजन करण्यात आल्याने महीलांतुन मोठा उत्साह पाह्यला मिळाला. यावेळी जिल्हा परिषद माजी उपाधक्ष धनंजय सावंत यांनी उपस्थित महिलांचे आभार मानले. यावेळी कार्यकत्यांच्या वतीने धनंजय सावंत यांचा पुष्पहार व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यकृमात जवळ जवळ ८००० महीला सहभागी झाल्या होत्या. प्रथम बक्षीस फ्रीज, व्दितीय बक्षिस एलईडी टीव्ही, तृतीय बक्षिस वॉशिंग मशीन, चतुर्थ बक्षीस आटा चक्की, पाचवे बक्षिस शिलाई मशीन देण्यात आले. या मुख्य पाच बक्षीसा शिवाय प्रत्येक सहभागी महिलेस एक आकर्षक पैठणी बक्षीस देण्यात आली.

# हिंगोलीत नवरात्रीनिमित्त दांडीया महोत्सवात नागरिकांची मोठी गर्दी

## सेलीब्रेटींच्याहस्ते उद्‌घाटन, दुर्गा मंडळांच्यावतीने दांडीयाचे आयोजन











**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ आक्टोबर**

हिंगोली शहरात नवरात्री महोत्सवानिमित्त दुर्गा मंडळांची स्थापना करण्यात आली असून या दुर्गामंडळांकडून भव्य दांडीयांचे आयोजन करण्यात आले आहे. दांडीयाच्या उद्‌घाटनासाठी अभिनेत्री, अभिनेते यांना पाचारण करण्यात आले असून या महोत्सवात तरूण-तरूणी तसेच महिला, पुरूष मोठ्या संख्येने उत्साहात सहभागी होत गरबा नृत्य करीत असतांना दिसत आहेत. १० आक्टोबरपर्यंत सायंकाळी ७ ते १० यावेळात गरबा दांडीयाचे आयोजन करण्यात आले आहे. या दांडीया महोत्सवाचे उद्‌घाटन प्रसिध्द अभिनेत्री सुप्रिया सोनेकर यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पोनि नरेंद्र पाडळकर, भाजपचे गजाननराव घुगे, युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील एनटीसी भागातील आई जगदंबा दुर्गा मंडळाच्या वतीने शिवलीला पॅलेसमध्ये दि ५ आक्टोबरपासून दांडीया महोत्सवाला सुरूवात झाली आहे. प्रसिध्द अभिनेत्री

शहरातील हनुमान नगर भागातील कलस्वामिनी नवदुर्गा मंडळाच्यावतीने ६ आक्टोबर आणि ७ आक्टोबर रोजी दांडीया महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे उद्‌घाटन अभिनेत्री सुरभी हांडे, विदीशशा मस्कर यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी आ. संतोष बांगर, युवासेनेचे जिल्हाध्यक्ष राम कदम यांची उपस्थिती होती.

येथील सवनेकर मंगल कार्यालयात उत्सव दांडीया मंडळाच्यावतीने गरबा दांडीयाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ललीत खुराणा, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या महोत्सवात तरूण-तरूणींनी गाण्यांच्या तालावर ठेका धरीत गरबा खेळण्याचा आनंद लुटला. तसेच महिला, पुरूष आणि बच्चे कंपनीही दांडीया उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध प्रकारचे पोषाख, पेहराव करून दांडीया खेळताना प्रत्येकजण दिसत होता. नवरात्र महोत्सवात महिलांनी नऊवारी साडी, गुजराती, पंजाबी, राजस्थानी तसेच विविध प्रकारच्या वेशभूषा परिधान करून गाण्यांच्या तालावर दांडीयाचा मनमुराद आनंद लुटला. तसेच तरूण आणि पुरूषांनही कुर्ता पायजमा, राजस्थानी, गुजराती पोषाख घालून दांडीयांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. राजकीय मंडळींसह प्रशासनातील अधिकारीही या दांडीया उत्सवामध्ये सहभागी झाले होते. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नेतेमंडळीही दांडीया उत्सवाला हजेरी लावत असून दांडीया खेळण्यचा आनंद घेत आहेत.

# राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांचा हिंगोली दौरा

## नागरिक, उद्योजक, प्रतिनिधींशी साधणार संवाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ आक्टोबर**

राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन दि ९ आक्टोबर रोजी हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार असून यावेळी ते नागरिक, उद्योजकांसह आजी-माजी लोकप्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत. याशिवाय अधिकाऱ्यांशी देखील चर्चा करणार आहेत. त्यांच्या दौऱ्याबाबतचे पत्र राज्यपालांच्या सचिवालयातून प्राप्त झाले असून प्रशासकीय यंत्रणेकडून तयारी सुरू करण्यात आली आहे.

राज्यपाल राधाकृष्णन यांच्या दौऱ्याबाबतचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आहे. राज्यपालांच्या सचिवालयातून पाठविण्यात आलेल्या पत्रात दि ९ आक्टोबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी प्रतिष्ठीत नागरिक, उद्योजक, पत्रकार, यांच्यासह ज्येष्ठ नागरिकांच्या भेटी घेऊन संवाद साधणार आहेत. त्यानंतर आजी-माजी खासदार, आमदार यांच्यासह राजकीय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करतील. याशिवाय अधिकाऱ्यांशीही संवाद साधणार आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने कार्यक्रम तयार करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, राज्यपाल राधाकृष्णन यांच्या दौऱ्याबाबत प्रशासकीय पातळीवरून तयारी सुरू करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या उपस्थितीत शनिवारी दि ५ आक्टोबर रोजी जिल्ह्यतील अधिकाऱ्यांची बैठक पार पडली असून या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक सूचना दिल्या आहेत. राज्यपालांना त्यांच्या दौऱ्यात हिंगोली जिल्ह्यातील कामकाजाची माहीती, विकासकामे, धार्मिक स्थळे, प्रेक्षणीस स्थळे यांची माहीती दिली जाणार आहे.

राज्यपालांच्या दौऱ्यानिमित्त येथील शासकीय विश्रामगृहातील फर्निचर तसेच डागडुजीची कामे युध्दपातळीवर सुरू असल्याचे दिसत आहेत.



**हिंगोली-.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने विजया दशमी उत्सवानिमित्त स्वयंसेवकांनी शहरातील स्व गोपीनाथराव मुंढे शेतकरी भवनापासून सुरूवात केली. त्यानंतर मंगळवारा, माहेश्वरी भवन, मारवाडी गल्ली, कपडा गल्ली, राजहंस नवदुर्गा मंडळ, त्रिशुल नवदुर्गा, महावीर चौक, विशाल नवदुर्गा, हरण चौक, शिवधनुष्य चौक, पोळा मारोती मंदिर परत स्व गोपीनाथराव मुंढे शेतकरी भवनापर्यंत पथसंचलन केले. यावेळी ठिकठिकाणी स्वयंसेवकांवर पुष्पवृष्टी करण्यात आली, रांगोळ्यांनी स्वागत करण्यात आले. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पैशासाठी विवाहीतेचा छळ, ७ जणांवर गुन्हा दाखल

औंढा नागनाथ- औंढा नागनाथ तालुक्यातील येळी येथील आम्रपाली उर्फ भाग्यश्री अतुल खिल्लारे वय १९ हिला माहेर हून चार चाकी वाहन घेण्यासाठी तीन लाख रुपये घेऊन ये याच्यासाठी छळहोत असल्याची तक्रार पोलिसात प्राप्त झाली असून पती अतुल खिल्लारे, सासरा बळीराम खिल्लारे, सासू, मावस सासू, सासऱ्याची बहीण, इत्यादी सात जनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आम्रपाली ही सध्या आपले माहेर येळेगाव सोळंके येथे वास्तव्यास आहे. विवाहितेने चार चाकी वाहन घेण्यासाठी तीन लाख रुपये घेऊन यावे असे म्हणून गेल्या कित्येक महिन्यापासून तिला सतत उपाशी ठेवणे, टोचून बोलणे, थापडबुक यांनी मारहाण करणे असा मानसिक व शारीरिक त्रास होत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे .महिला दक्षता समिती हिंगोली कडून औंढा नागनाथ पोलीस ठाण्यात पत्र प्राप्त झाल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्याप कोणत्याही आरोपीस अटक करण्यात आले नसल्याचे पोलीस निरीक्षक गणेश राहिरे यांनी सांगितले. पुढील तपास पोलीस जमादार हरकाळ हे करीत आहेत.

### लग्नाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार

औंढा नागनाथ-तालुक्यातील जवळाबाजार येथील पोलीस चौकी अंतर्गत औंढा नागनाथ येथे फिर्यादी राजकन्या योगीराज गुडदे वय २६ वर्ष राहणार पिंपळा जिल्हा वाशिम हल्ली मुक्काम अल्लाडा प्लॉट वाशिम येथील रहिवाशी यांनी दाखल केले की आरोपी नामे विश्वजीत बाबुराव गायकवाड, दिव्या जोंधळे, अनिता कीर्तने सर्व राहणार जवळा बाजार तालुका औंढा जिल्हा हिंगोली या सर्व आरोपींनी संगणमत करून फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवून दिनांक २९ /८/ २०१४ रोजी च्या रात्री व दिनांक ४/९ २०२४ रोजी दुपारी दीड वाजेपर्यंत जवळा बाजार येथील आरोपी क्रमांक एक यांच्या घरी व हिंगोली येथील आरोपीची मावस बहीण असलेल्या यांच्या घरी अनेक वेळा अत्याचार केले व या घटने मुळे फिर्यादीस गर्भधारणा झाली व लग्नास नकार देत जीवे मारण्याची धमकी दिल्याने औंढा नागनाथ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदर प्रकरणी जी एस राहिरे पोलीस निरीक्षक औंढा व जवळा बाजार पोलीस चौकीचे सहपोलीस उपनिरीक्षक एम जिव्हारे यांनी गुन्ह्याची शहानिशा करून गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणी अद्याप पर्यंत आरोपीला अटक नसली तरीही गुन्ह्याचा तपास चालू असून पुढील तपास सह पोलीस उपनिरीक्षक एम जिव्हारे हे करीत आहेत.

### सोयाबीन कापणीची लगबग

हिंगोली- पावसाने मागील चार पाच दिवसांपासून उघडीप घेतल्यामुळे जिल्ह्यात सोयाबीन कापणी आणि काढणीला शेतकऱ्यांनी सुरूवात केली असून सोयाबीन विक्रीसाठीही आता बाजार समितीच्या आवारात येत असतांना दिसत आहेत. कापणीसाठी संपूर्ण शेतकरी कुटुंब कापणीच्या कामात लागल्याचे दिसत आहे. यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकासह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी शासनाच्या मदतीची वाट पाहत आहे.

# सार्वजनिक महोत्सव समितीच्यावतीने हॉलीबॉल स्पर्धेला सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ आक्टोबर**

सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक ६ ऑक्टोबर रोजी हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन दसरा समितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव, माजी नगरसेवक उमेश गुठ्ठे, जितेंद्र भट्ट, मनोहर माने, ॲड. देशमुख, सुशील इंगोले, राजकुमार जगताप, कपिल खंदारे, प्रविण आग्रवाल, आनंद भट्ट, मिर्झा सलीम, सुधीर घुगे, शशिकांत रामेश्वरे, डॉ. कैलास कोटकर, डॉ. माणिकराव देशमुख,भैय्या सवनेकर, अर्शद अली, निलेश, राजू जैस्वाल, संजय जैस्वाल, आयुष राठोड आदींची उपस्थीती होती. हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन माजी नगरसेवक उमेश गुट्टे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बालविवाह विरोधी सक्षम गावे करण्यासाठी जिल्हास्तरीय बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ आक्टोबर**

जिल्ह्यात शासकीय यंत्रणेच्या मध्यमातून बालविवाह प्रतिबंधासाठी जाणीव जागृतीद्वारे जिल्ह्याला सक्षम करण्यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) गणेश वाघ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली.

या बैठकीत ग्रामपंचायत आणि अंगणवाडी यांच्या माध्यमातून अतिजोखीम घटकांतील मुलीच्या नोंदी घेऊन त्यांचा बालविवाह होऊ नये यासाठी त्यांना सामाजिक पालकत्व घेण्यासाठी आवाहन करणे, तसेच पात्र मुलींना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेशी जोडणे, तसेच इतर शासकीय योजनेशी जोडणे या विषयावर चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यात बालविवाह निर्मूलनावर काम करणाऱ्या सर्व विभाग प्रमुखांनी प्रत्येक गावामध्ये ग्राम बाल संरक्षण समितीचे गठन आणि त्या सक्रीय करण्यासाठी पंचायत विभागाकडून प्रयत्न करणे, शिक्षण विभाग व एकात्मिक बाल विकास विभागाकडून बालविवाह निर्मूलन विषयी रॅली काढून घोषणाद्वारे जाणीव जागृती करणे, दर सोमवारी बालविवाह विषयीची शपथ घेणे. शाळेमध्ये चित्रकला, निबंध, वकृत्व स्पर्धेचे आयोजन करणे. शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून मानवी साखळी तयार करून बालविवाहाची शपथ घेणे, अंगणवाडी सेविकाच्या माध्यमातून प्रत्येक गावात बालविवाह विषयीचे पोस्टर चिटकवणे, तसेच किशोरवयीन मुलीचे समुपदेशन आणि विवाहाच्या स्थितीच्या नोंदी ठेवणे, सेवा पुरवठादार याच्या बैठका घेणे. तसेच गावात बालविवाह होऊ नये म्हणून ठराव सुद्धा घेण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. जिल्ह्यात बालविवाह विषयी जाणीव जागृती करून प्रत्येकाला सक्षम करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

या बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) गणेश वाघ, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजाभाऊ मगर, उपशिक्षणाधिकारी नितीन नेटके, विस्तार अधिकार श्री. गुढे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एन. फोपसे, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक विकास कांबळे, प्रकल्प समन्वयक मोनाली धुर्वे व सामाजिक कार्यकर्ता रामप्रसाद मुडे उपस्थित होते.

# आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत मुग, उडीद, सोयाबीन खरेदी सुरू

## शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन, जिल्ह्यात नऊ खरेदी केंद्र निश्चित

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ६ आक्टोबर**

केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत एनसीसीएफच्या वतीने खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये मूग, उडीद, सोयाबीन खरेदी करण्यासाठी खरेदी केंद्र निश्चित करण्यात आले असून, या खरेदी केंद्रावर मूग, उडीद, सोयाबीन खरेदीसाठी दि. १ ऑक्टोबर, २०२४ पासून नोंदणी सुरु करण्यात आली आहे. तसेच याच खरेदी केंद्रावर दि. १० ऑक्टोबर,२०२४ ते दि. ०७ जानेवारी,२०२५ पर्यंत मूग व उडीद खरेदी तर दि. १५ ऑक्टोबर, २०२४ ते दि. १२ जानेवारी, २०२५ पर्यंत सोयाबीन खरेदी सुरु करण्यात येणार आहे.

मूग, उडीद, सोयाबीन खरेदी करण्यासाठी जिल्ह्यात नऊ खरेदी केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. त्या ठिकाणी नोंदणी सुरु करण्यात आलेली आहे. खरेदी केंद्राचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कयाधु शेतकरी उत्पादक कं. मर्या. तोंडापूर ही संस्थेचे खरेदी केंद्र वारंगा फाटा व कळमनुरी येथे आहेत. वारंगा फाटा येथील केंद्रावर केंद्र चालक म्हणून मारोती शिवदास कदम (संपर्क ९७३६४४९३९३) तर कळमनुरी येथील केंद्रावर प्रशांत तुकाराम मस्के (९९२१६०९३९३) हे आहेत.

हजरत नासरगंज बाबा स्वयंसेवी सेवा सहकारी संस्था या संस्थेचे खरेदी केंद्र येहळेगाव ता. औंढा नागनाथ येथे आहे. या केंद्रावर केंद्र चालक म्हणून शेख गफार शेख अली हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९८८१५०१०४० असा आहे. प्रगती स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था,हिंगोली या संसथेचे खरेदी केंद्र बळसोंड येथे आहे. या संस्थेवर केंद्रचालक म्हणून नारायण शामराव भिसे हे कामकाज पाहणार असून ९८५०७९२७८४ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

औंढा नागनाथ तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्या. औंढा (ना) या संस्थेचे खरेदी केंद्र जवळा बाजार ता. औंढा नागनाथ येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक म्हणून कृष्णा नामदेव हरणे हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९१७५५८६७५८ असा आहे. श्री संत नामदेव स्वयंरोजगार सहकारी संस्था म. चोरजवळा या संस्थेचे खरेदी केंद्र कन्हेरगाव ता. जि. हिंगोली येथे आहे. या संस्थेवर केंद्रचालक म्हणून अमोल जयाजीराव काकडे हे कामकाज पाहणार असून त्यांचा संपर्क क्र. ८००७३८६१४३ आहे.विजयलक्ष्मी बेरोजगार सहकारी संस्था म. कोळसा ता. सेनगाव या संस्थेचे खरेदी केंद्र साखरा ता. सेनगाव येथे आहे. या केंदावर केंद्र चालक म्हणून उमाशंकर वैजनाथ माळोदे हे काम पाहणार आहेत. त्यांना ९४०३६५१७४३ क्रमांकावर संपर्क साधावा. श्री संत भगवानबाबा स्वयंरोजगार सेवा संस्था कोथळज या संस्थेचे खरेदी केंद्र सेनगाव येथे आहे. या केंद्राचे केंद्र चालक म्हणून निलेश रावजीराव पाटील (९८८११६२२२२) हे असून, वसमत तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्यादित, वसमत या संस्थेचे खरेदी केंद्र वसमत येथे आहे. या केंद्रावर केंद्र चालक म्हणून सागर प्रभाकर इंगोले हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ८३९०९९५२९४ असा आहे.

शेतकरी बांधवांनी आपल्या तालुक्यातील केंद्राच्या ठिकाणी संपर्क करुन नोंदणी करावी. नोंदणीसाठी हंगाम २०२४-२५ मधील पीक पेरा नोंद असलेला ऑनलाईन सातबारा, आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स सोबत आणावे व बँक पासबूकवर शेतकऱ्यांचे नाव, खाते क्रमांक, आय. एफ. एस. सी. कोड स्पष्ट असावा (जनधन बँक खाते किवा पतसंस्थेतील खाते क्रमांक देऊ नये). संबंधित तालुक्यातील केंद्राच्या ठिकाणी मूग, उडीद, सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी नोंदणी करावे, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी, परभणी/हिंगोली यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.